## आजचा शुभ विचार

""नशिबावर विश्वास ठेवण्यापेक्षा स्वतःच्या ताकदीवर विश्वास ठेवा."आपण जे करतोय किंवा आपल्यात जी ताकद आहे ती ओळखायला शिका. नशिबावर निर्भर राहू नका."
डॉ. बाबासाहेब आंबेडकर

RNI NO. - MAHMAR/2023/87923

SWARAJYADOOT

# स्वराज्यदूत

www.swarajyadoot.com पहारेकरी सत्याचा.. कैवारी बहुजनांचा..!








मुख्य संपादक - श्री. भास्कर जी. देवरे | उपसंपादक - श्री. शांताराम देवरे | कार्यकारी संपादक- श्री. मनोहर देवरे | निवासी संपादक- श्री.संतोष बी.मोहिते

DAILY ▪ MARATHI ▪ YEAR- 3 ▪ ISSUE-41 ▪ Published from NASHIK (MAH) ▪ Saturday 14 June 2025 ▪ PAGES 6 ▪ Price - 4 Rs.

दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष ३ ▪ अंक ४१ ▪ नाशिक ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित ▪ शनिवार, दि. १४ जुन २०२५ ▪ पाने ६ ▪ ₹ ४ रुपये


# राज ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांची भेट

## 'ताज लँड्स'मध्ये बंद दाराआड चाललंय काय ? महाराष्ट्राच्या राजकारणाला नवं वळण मिळणार ?

## दोन्ही ठाकरे बंधू एकत्र येण्याचा मार्ग मोकळा होणार कि चर्चेला पूर्णविराम ?

ओम सोमवंशी
मुंबई प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------------



उद्धव सेना ही राज ठाकरेंच्या मनसेसोबत युती करण्यास उत्सुक असल्याच्या बातम्या काही दिवस येत होत्या. या पार्श्वभूमीवर मुंबईत 'ताज लँड्स' हॉटेलमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मनसे प्रमुख राज ठाकरे यांची भेट झाली. दोघांनी बंद दाराआड तासभर चर्चा केली. चर्चेविषयी सविस्तर माहिती देणे दोन्ही नेत्यांनी चतुराईने टाळले. यामुळे राजकीय वर्तुळात अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. उलटसुलट चर्चेला उधाण आले आहे. मुख्यमंत्री आणि राज यांच्यातील चर्चेमुळे उद्धव सेना आणि मनसे यांची संभाव्य युती होण्याआधीच तुटल्याची शक्यता व्यक्त होत आहे. वांद्र्यातील ताज लँड्स एंड या पंचतारांकित हॉटेलमध्ये सकाळीच मनसे प्रमुख राज ठाकरे पोहोचले. थोड्या वेळाने तिथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पोहोचले. यानंतर राज ठाकरेंनी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. दोघांनी बंद दाराआड तासभर चर्चा केली. याआधी मागील दोन महिन्यांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी उद्धव सेना ही राज ठाकरेंच्या मनसेसोबत युती करणार असल्याची चर्चा होत होती. निर्माते दिग्दर्शक महेश मांजरेकर यांना दिलेल्या मुलाखतीत राज यांनी युतीचा विचार करत असल्याचे संकेत दिले होते. मात्र दोन्ही पक्षांमध्ये युतीला पूरक अशी चर्चा झाली नव्हती. या पार्श्वभूमीवर गुरुवार १२ जून रोजी सकाळीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मनसे प्रमुख राज ठाकरे यांची भेट झाली. या भेटीचा कार्यक्रम आधी जाहीर झालेला नव्हता. यामुळेच मुख्यमंत्री आणि राज ठाकरे यांच्यात ताज लँड्स एंड हॉटेलमध्ये झालेल्या चर्चेअंती उद्धव सेना आणि मनसेच्या युतीच्या चर्चेचा दी एंड झाल्याची चर्चा सुरू झाली आहे. देवेंद्र फडणवीस आणि राज ठाकरे यांच्या भेटीतून महायुतीसाठी काही चांगलं होणार असेल तर या भेटीचे आम्ही स्वागत करतो; असे राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत म्हणाले. मुख्यमंत्र्यांच्या राजकीय चतुराईची कल्पना साऱ्यांना आहे आणि राज ठाकरे हे स्वतंत्र राजकीय विचारांचे आहेत. यामुळे काय चर्चा झाली किंवा काय ठरलं याचे अंदाज करण्यापेक्षा त्यांच्याकडून अधिकृतपणे काय सांगितलं जातं आणि कधी सांगितलं जातं याची वाट बघणेच योग्य होईल; असेही उद्योगमंत्री उदय सामंत म्हणाले.

### मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी घेतली शिंदेंची भेट
### राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधान

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्या भेटीनंतर मनसेचे पदाधिकारी संदीप देशपांडे आणि अमेय खोपकर या दोघांनी उपमुख्यमंत्री आणि शिवसेनेचे नेते एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. यामुळे पुन्हा एकदा मनसे महायुतीत प्रवेश करणार का ? या चर्चेला उधाण आले आहे.**

# कॅप्टन सुमित सभरवालचा बाबांना अखेरचा कॉल, निवृत्त होऊन वडिलांची सेवा करण्याची इच्छा अपूर्ण

## ८८ वर्षीय वडिलांवर दु:खाचा डोंगर

विशेष वृत्त सेवा
दैनिक स्वराज्यदूत

--------------------



अहमदाबादहून लंडनला जाणाऱ्या अपघातग्रस्त विमानाचे कॅप्टन सुमीत सभरवाल यांची निवृत्त होऊन वडिलांची सेवा करण्याची इच्छा होती. मात्र, त्यांची ही शेवटची इच्छा अपूर्णच राहिली. गुजरातमधील अहमदाबाद येथे काल (१२ जून) झालेल्या एअर इंडियाच्या विमान अपघातात २६५ जणांचा मृत्यू झाला आहे. यात विमानातील २४१ प्रवासी तर विमान ज्या भागात कोसळलं तिथल्या २४ जणांचा मृत्यू झाला. यावेळी विमानात १० केबिन क्रू मेंबर्ससह एकूण २४२ प्रवासी होते. अपघातात विमानातील फक्त एक प्रवासी वाचला, उर्वरित सर्वांचा मृत्यू झाला.

### मोठं संकट

अहमदाबादमध्ये गुरुवारी झालेल्या विमान अपघातात २६५ जणांचा मृत्यू झाल्याचे पोलिसांनी सांगितले. विमान शहरातील कमी लोकवस्तीच्या भागात पडले. याउलट दाट लोकवस्तीत पडले असते तर मृतांचा आकडा एकदम वाढला असता, असे तज्ज्ञ सांगत आहेत. अनियंत्रित होत असलेले विमान दाट लोकवस्ती ऐवजी विरळ लोकवस्तीच्या भागात पडावे यासाठी मुख्य वैमानिक सुमीत सभरवाल यांनी प्रयत्न केले. यामुळे मोठी जीवितहानी टळली आहे. विमानातील यंत्रणां बंद पडल्या आणि उड्डाणानंतर अवघ्या काही सेकंदात विमान पडले. मिळालेल्या मर्यादीत वेळेत विमान शक्य तेवढे वळवून कमीत कमी वस्ती असलेल्या भागाकडे नेण्याची खबरदारी घेऊन मुख्य वैमानिक सुमीत सभरवाल यांनी त्यांचे कर्तव्य प्रामाणिकपणे पूर्ण केले. या प्रयत्नात त्यांनी प्राण गमावले. पण तज्ज्ञ सबरवाल यांनी घेतलेल्या खबरदारीसाठी त्यांचे कौतुक करत आहेत.

### वडिलांना मोठा धक्का

पवईच्या जलवायू विहारमध्ये राहणारे सुमीत सभरवाल राहत होते. सुमीत सभरवाल यांचे ८८ वर्षीय वडील या अपघाताची माहिती कळल्यानंतर हादरून गेले आहेत. विमान उड्डाण करायला तासभर असताना त्यांनी वडिलांना फोन केला होता. लंडनला पोहोचल्यावर फोन करतो, तोवर काळजी घ्या असेही सांगितले होते. त्यांच्या अपघाती मृत्यूनंतर वडिलांनी ही आठवण सांगितली. सुमीत सभरवाल यांच्या गाठीशी ८२०० तासांचा उड्डाणाचा अनुभव होता. त्यांच्या आईचे २ वर्षांपूर्वी निधन झाले होते. त्यानंतर वडिलांचा सांभाळ करण्याची जबाबदारी सुमीत यांच्यावर होती. सभरवाल अविवाहित होते. अशी माहिती आमदार दिलीप लांडे यांनी दिली.

### अन्य क्रू मेंबरमध्ये कोण?

या अपघातात क्रू मेंबर अपर्णा महाडिक यांचाही अपघाती मृत्यू झाला आहे. त्या गेली १० वर्षे हवाईसुंदरी म्हणून कार्यरत होत्या. अपर्णा महाडिक या ४० वर्षांच्या होत्या. त्यांना ९ वर्षांची मुलगी आहे. खासदार सुनील तटकरे यांच्या भाच्याच्या त्या पत्नी होत्या. महाडिक यांचे पती एअर इंडियामध्ये कार्यरत आहेत. त्या गोरेगाव येथे राहायच्या. त्यांना एक मुलगी आहे. तर विमानाचे फर्स्ट ऑफिसर क्लाइव्ह कुंदर बोरिवलीमध्ये राहायचे. ते अभिनेता विक्रांत मॅस्सीचे भाऊ होते.

# अहमदाबाद मध्ये एअर इंडियाचे विमान कोसळले; विमानातील 242 पैकी 241 जणांचा मृत्यू

## केंद्रीय गृहमंत्री आणि पंतप्रधान यांची घटना स्थळाला भेट

विशेष प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत







अहमदाबाद मध्ये विमान कोसळून झालेल्या दुर्घटनेत 242 पैकी 241 जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे. एअर इंडियाने या माहितीला दुजोरा दिला आहे. एअर इंडियाच्या या विमानात 230 प्रवासी आणि 12 क्रू मेंबर्स होते. भारतीय वंशाचे एक ब्रिटीश प्रवासी या दुर्घटनेतून बचावले आहेत. अपघातानंतर अहमदाबादला पोहोचलेल्या केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटलं की, " बहुतेक सर्व प्रवाशांचे मृतदेह बाहेर काढण्याचे काम पूर्ण झाले आहे. सव्वा लाख लीटर इंधन असल्यामुळे तापमान इतके जास्त झाले होते की कोणीही वाचण्याची शक्यता नव्हती." हे विमान अहमदाबाद शहरात विमानतळाजवळ मेघानीनगर या रहिवाशी भागात कोसळलं आहे. दुर्घटनाग्रस्त विमान कंपनीचं ड्रीमलायनर प्रकारातलं 787-8 हे विमान होतं. या अपघातात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपानी यांचंही निधन झाल्याचं स्पष्ट झालं आहे.



गुजरात भाजपचे प्रदेशाध्यक्ष सी. आर. पाटील यांनी माध्यमांशी बोलताना या वृत्ताला दुजोरा दिला आहे. रुपाणी हे विमानानं लंडनला जात होते. त्यामुळं त्यांचं निधन भाजपासाठी सगळ्यात मोठी हानी असल्याचं सी.आर.पाटील यांनी म्हटलं आहे. दरम्यान, या अपघातातून ब्रिटिश नागरिक असलेले एक प्रवासी वाचले आहेत. विश्वास कुमार रमेश असं त्यांचं नाव असून ते विमानातील 11A क्रमांकाच्या सीटवर होते अशी माहिती अहमदाबादचे पोलीस आयुक्त जी.एस. मलिक यांनी दिली. "विमानानं उड्डाण घेताच 30 सेकंदातच मोठा आवाज झाला आणि विमान कोसळलं. हे एवढ्या कमी वेळात घडलं की, काही समजलं नाही," असं विश्वास माध्यमांशी बोलताना म्हटल्याचं समोर आलं आहे. विश्वास कुमार रमेश यांचे लेस्टर शहरातील नातलग अजय वालगी यांच्याशी आम्ही संपर्क केला. ते म्हणाले, "विश्वास यांनी कुटुंबीयांना फोन करुन आपण सुखरुप असल्याचं सांगितलं. प्रवाशांमध्येच असणारे त्यांचे बंधू अजय यांच्याबद्दल काही माहिती नसल्याचं त्यांनी सांगितलं. त्यांचे नातेवाईक जमायला सुरुवात झाली. आम्ही त्याबद्दल अधिक माहिती मिळवण्याच्या प्रयत्नात आहोत. विश्वास यांना पत्नी आणि एक मूल आहे." विश्वास यांचा भारतात जन्म झाला आणि गेली अनेक वर्षं ते इंग्लंडमध्ये राहात आहेत अशी माहिती बीबीसीला मिळाली आहे.

**उड्डाणानंतर लगेचच अपघात**

हे विमान एअर इंडियाचे Flight AI171 होते.उड्डाणा नंतर माहिती मिळत आहे. 242 प्रवाशांसह हे विमान लंडनला गॅटविक येथे जात होते. या अपघातस्थळी अग्निशमन दलाची वाहनं, पोलीस तसेच मदतकार्य करणारी पथकं कार्यरत झाली असून गुजरात सरकार आणि केंद्र सरकार मदतकार्य करत आहेत. हे विमान मुलांच्या वसतिगृहावर कोसळलं आहे. बीबीसीशी बोलताना रुग्णालयात काम करणाऱ्या एका व्यक्तीनं सांगितलं, "घटनेनंतर सर्वत्र काळाधूर पसरला, रुग्णवाहिका तिकडे धावल्या. लोकांच्या देहाचे तुकडे पडले होते. मुलांच्या वसतिगृहालाही धक्का बसला असेल. या घटनेमुळे 2001 साली झालेल्या भूकंपाची आठवण झाली.'' टाटा समूहाकडून या अपघातावर तीव्र दुःख व्यक्त करण्यात आलं आहे. या दुर्घटनेतील प्रत्येक मृताच्या कुटुंबीयांना 1 कोटींची मदत देणार असल्याच टाटा सन्सचे अध्यक्ष एन. चंद्रशेखरन यांनी एक्सवर केलेल्या एका पोस्टमध्ये सांगितलं. त्याचबरोबर जखमी झालेल्यांच्या उपचाराच्या खर्चाचा भारही उचलणार असल्याचं टाटा समूहानं स्पष्ट केलं आहे. तसंच बी.जे.मेडिकल कॉलेजच्या हॉस्टेलच्या इमारतीचं पुन्हा बांधकाम करण्यासाठी मदत करणार असल्याचंही चंद्रशेखरन म्हणाले आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी या अपघाताबद्दल म्हणाल्या, "अहमदाबादमध्ये झालेल्या दुर्दैवी विमान दुर्घटनेमुळे मला अत्यंत दुःख झालं आहे. ही हृदयद्रावक दुर्घटना आहे. माझ्या भावना आणि प्रार्थना पीडित लोकांसोबत आहेत. या दुःखाच्या क्षणी संपूर्ण देश त्यांच्यासोबत उभा आहे." या दुर्घटनेवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दुःख व्यक्त केले आहे. "अहमदाबादमधील दुर्घटनेनं आम्हा सर्वांना स्तब्ध आणि दुःखी केलं आहे. हे शब्दांत व्यक्त करता येणार नाही. या दुःखद क्षणी माझ्या सहवेदना पीडितांसोबत आहेत. मदतकार्यात गुंतलेल्या संबंधित मंत्र्यांशी आणि प्रशासनाशी मी संपर्कात आहे," असं त्यांनी म्हटलं आहे. अहमदाबाद-लंडन विमान भीषण अपघात अत्यंत हृदयद्रावक, वेदनादायक असल्याचे नमूद करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अपघातातील मृत आणि नातेवाईकांप्रती संवेदना प्रकट केली आहे. "अनेकांनी आपल्या घरातील कर्ते आणि जीवलग गमावले आहेत. काळाने घातलेली ही झडप अनेक कुटुंबियांसाठी शब्दांच्या पलिकडली आणि हृदय पिळवटून टाकणारी आहे. या सगळयांच्या दुःखात आम्ही सर्व, महाराष्ट्राची जनता सहभागी आहे. त्यांना या दुःखद आघातातून सावरण्याची शक्ती मिळो, अशी ईश्वचरणी प्रार्थना करतो", असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले आहे.

**अमित शाह यांची घटनास्थळाला भेट**

संध्याकाळी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, नागरी उड्डाणमंत्री राममोहन नायडू नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी घटनास्थळी माहिती दिली. यावेळेस अमित शाह यांनी माध्यमांना दिलेल्या माहितीमध्ये दुःख व्यक्त केले आहे.

ते म्हणाले, "मी घटनास्थळी जाऊन आलो. जवळपास सर्व मृतदेहांना बाहेर काढण्यात आले आहेत. येथे उपस्थित असलेल्या नातलगांचे डीएनए नमुने घेण्यास सुरुवात झाली आहे. परदेशी नागरिकांच्या नातलगांनाही यासाठी निरोप पोहोचवले आहेत. जवळपास 1000 डीएनए चाचण्या गुजरातमध्ये करण्यात येतील. डीएनए चाचणीनंतर नातलगांना ते मृतदेह सोपवण्यात येतील. नातलगांच्या राहाण्याच्या, मानसिक मदतीची सोय करण्यात आली आहे. हवाई वाहतूक विभागाने तपासाला सुरुवात केली आहे. या मदतकार्यात ज्यांनी सहभाग घेतला त्यांचे मी आभार मानतो. ज्या कुटुंबीयांनी आपले नातलग या घटनेत गमावले आहेत त्यांच्याप्रती मी सहवेदना व्यक्त करतो."

**1. विमानात किती प्रवासी होते?**

या विमानात 242 प्रवासी होते अशी माहिती एअर इंडियाने एक्स या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर केलेल्या पोस्टमध्ये दिली आहे. तसेच या विमानात 2 वैमानिक आणि 10 कर्मचारी होते. या विमानाची धुरा कॅप्टन सुमित सभरवाल आणि फर्स्ट ऑफिसर क्लाइव्ह कुंदर यांच्याकडे होती अशी माहिती डीजीसीएने दिली आहे.

एअर इंडियाच्या माहितीनुसार 242 पैकी 169 प्रवासी भारतीय होते, 53 ब्रिटिश नागरिक होते, 1 व्यक्ती कॅनेडियन होता तर 7 लोक पोर्तुगालचे होते.

**2. पोलिसांनी काय माहिती दिली?**

अहमदाबाद झोन-4 चे डीसीपी कानन देसाई यांनी या परिसरात विमान अपघात झाल्याचे पीटीआयशी केलेल्या संवादात स्पष्ट केले आहे.

अहमदाबादचे पोलीस आयुक्त जी.एस. मलिक यांनी पीटीआयला सांगितले की, "विमानतळाजवळील मेघानीनगर परिसरात एक विमान कोसळले आहे. ते कोणत्या प्रकारचे विमान होते हे अद्याप स्पष्ट झालेले नाही."

अग्निशमन अधिकारी जयेश खाडिया म्हणाले, " विमान कोसळल्यानंतर त्याला आग लागली. आग विझविण्यासाठी अग्निशमन दलाच्या गाड्या पाठवण्यात आल्या आहेत."

दुसरीकडे, एएनआयने नागरी उड्डाण महासंचालक (डीजीसीए) यांचे निवेदन प्रसिद्ध केले आहे. त्यानुसार, "कॅप्टन सुमित सभरवाल यांना 8200 तासांच्या उड्डाणाचा अनुभव होता. तसेच सह-वैमानिकाला 1100 तासांच्या उड्डाणाचा अनुभव होता. एटीसी (एअर ट्रॅफिक कंट्रोलर) नुसार, या विमानाने अहमदाबादहून दुपारी 1.38 वाजता उड्डाण केले. त्यांनी एटीसीला डिस्ट्रेस कॉल केला, परंतु त्यानंतर एटीसी कॉलला कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. धावपट्टीवरून उड्डाण केल्यानंतर लगेचच विमान विमानतळाच्या बाहेर जमिनीवर पडले. अपघातस्थळावरून काळा धूर निघताना दिसत होता." अशा प्रकारचा विमान अपघात घडतो, तेव्हा तपासकर्त्यांना विमानाच्या ब्लकचा शोध असतो. त्यामुळे, या विमानातील ब्लॅक बॉक्सचा देखील शोध घेतला जाईल. ब्लॅक बॉक्स विमानाच्या मागच्या भागात लावलेला असतो.

**3. गुजरातचे मुख्यमंत्री काय म्हणाले?**

राज्याचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांनीही अहमदाबादमधील विमान अपघाताच्या घटनेवर दुःख व्यक्त केले आणि एक्स वर माहिती दिली आहे. ते लिहितात, "अहमदाबादमध्ये एअर इंडियाच्या प्रवासी विमान अपघाताच्या दुर्घटना घडल्यामुळे मला दुःख झाले आहे. मी अधिकाऱ्यांना अपघातात त्वरित मदतकार्य हाती घेण्याचे आणि जखमी प्रवाशांवर युद्धपातळीवर त्वरित उपचार करण्याची व्यवस्था करण्याचे निर्देश दिले आहेत."

संपादकीय

# विमान दुर्घटना भयावह; कशामुळे नि कोणामुळे?

१२ जून २०२५ ही तारीख, सर्व देशवासीयांसाठी एक भयावह मृत्यूचा थरार ऐकविणारी ठरली. कोणाच्या मनीध्यानी नसताना गुरुवारी दुपारी गुजरातमध्ये झालेल्या विमान अपघातानंतर देशाचे वातावरण हादरून गेले. परदेशी प्रवाशांना घेऊन लंडनसाठी रवाना झालेले एअर इंडियाचे विमान अहमदाबादमधील मेघानी नगर परिसरात काही मिनिटांत कोसळल्याची दुर्घटना घडते. या अपघाताची माहिती ज्यांच्या ज्यांच्या कानावर पडते त्यांची एक सार्वत्रिक प्रतिक्रिया असते, "बापरे". बातमी वाऱ्यासारखी देशभर पसरते अन् सारा देश सुन्न झाल्याचे चित्र पाहायला मिळते. या विमानात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपाणी यांच्यासह एकूण २४२ प्रवासी होते.

ज्या डॉक्टरांच्या हॉस्टेलच्या इमारतीवर विमान आदळले, तिथे किती नुकसान झाले. डॉक्टरांसह किती जणांचे बळी गेले हा आकडा कानावर येण्याअगोदर विमानातील २०० हून अधिक मृत्युमुखी पडल्याची बातमी हृदय हेलावणारी होती. सुदैवाने दोन प्रवासी नशीब बलवत्तर म्हणून वाचला. आता विमान जळून खाक झालं. त्यामुळे प्रवाशांची ओळख पटणे हे जिकिरीचे काम असल्याने, जे प्रवासी मृत्युमुखी पडले त्यांचे अंत्यसंस्कार कसे होणार हा नातेवाइकांच्या दृष्टीने भावनिक मुद्दा आहे. विमान प्रवाशांबरोबर काळाने डॉक्टरांच्या समूहावरही घाला घातला. दुपारचे जेवण करताना तोंडात घास पडण्याऐवजी २० हून अधिक डॉक्टरांना मृत्यूने कवटाळल्याचा प्रकार हा स्थानिक गुजरातच्या जनतेवर दु:खाचा डोंगर कोसळल्यासारखाच होता.

हा अपघात कसा झाला हे अद्याप स्पष्ट झाले नसले तरी, एअर इंडियाचे विमान टेकऑफनंतर काही मिनिटांत दुर्घटना घडली. लगेच ६२५ फुटांवरील विमान अहमदाबाद हॉर्स कॅम्पजवळ कोसळले. बोईंग विमानाने आधी पेट घेतला आणि नंतर ते कोसळले. विमानाचा मागचा भाग झाडाला धडकल्याने अपघात झाला की, विमानाच्या इंजिनात बिघाड झाल्याने हा अपघात झाला हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. भारतात आतापर्यंत झालेल्या विमान अपघाताच्या दुर्घटनांमध्ये अहमदाबादचा अपघात ही अलीकडची मोठी दुर्घटना मानली जात आहे. मात्र या विमान अपघाताच्या बातमीनंतर मुंबईकरांना घाटकोपरसारख्या गजबजलेल्या परिसरामध्ये २०१८ साली कोसळलेल्या विमान अपघाताची आठवण झाली.

घाटकोपरमध्ये कोसळलेले विमान हे लहान आकाराचे म्हणजेच चार्टर विमान होते. चाचणी उड्डाणादरम्यान म्हणजेच टेस्ट फ्लाईटदरम्यान किंग एअरचे चार्टर विमान अपघातग्रस्त होऊन वस्तीत शिरले होते. तसे पाहिले तर भारतात पहिला विमान अपघात १९३८ मध्ये झाला होता. एअर फ्रान्सचे पोटेझ विमान मध्य प्रदेशातील दातियाजवळ कोसळले. त्यात सात जणांचा मृत्यू झाला होता. गेल्या पंधरा वर्षांतील भारतातील दुसरा मोठा अपघात कर्नाटकातील मंगळूरु येथे मे २०१० मध्ये घडला, या अपघातात १५८ जण मृत्युमुखी पडले होते. फेब्रुवारी १९९० मध्ये बंगळूरुमध्ये एअरबस ए ३२० विमान लँडिंग करताना धावपट्टीवरून घसरले आणि शेतात पडले, त्यात ९२ जणांचा मृत्यू झाला होता. पायलटच्या चुकीमुळे आतापर्यंत अनेक दुर्घटना घडल्या आहेत. मात्र, याआधी विमानावर दहशतवादी हल्लाही झाला होता. तो जून १९८५ साली खलिस्तान समर्थकांनी विमानावर दहशतवादी हल्ला केला होता.

एअर इंडिया फ्लाइट १८२ त्यावेळी आयर्लंडच्या किनाऱ्याजवळ अटलांटिक महासागरात बॉम्बस्फोटात उडवून देण्यात आले होते. त्यात ३२९ लोकांचा मृत्यू झाला होता. आतापर्यंत झालेल्या विमान अपघाताची कारणे पाहिली तर वैमानिकाची चूक हे विमान अपघातांचे एक प्रमुख मानले जाते. वैमानिकांकडून जेव्हा टेकऑफ दरम्यान वेग, धावपट्टीच्या लिफ्ट ऑफ पॉइंट किंवा पिच अँगलचा चुकीचा अंदाज घेतला जातो, तेव्हा अपघात होतात. आंतरराष्ट्रीय विमान वाहतूक अहवालांनुसार, टेकऑफ आणि लँडिंग दरम्यान होणाऱ्या बहुतेक अपघातांमध्ये मानवी चूकही कारणभूत ठरली आहे. त्याचे कारण, टेकऑफ अपघातांपैकी ६५% मानवी चुकांमुळे होतात आणि २०% तांत्रिक बिघाडामुळे तर, १०% हवामानामुळे होतात, ५% इतर कारणांमुळे होतात, अशी जगभरातील आकडेवारी सांगते.

संपूर्ण टेकऑफ प्रक्रिया पायलटच्या नियंत्रणाखाली असते. प्रत्येक निर्णय काही सेकंदांत घ्यावा लागतो. टेकऑफ दरम्यान ऑटो-पायलट नसतो, सर्व नियंत्रण मॅन्युअल असते. टेकऑफचे नियोजन आणि आपत्कालीन स्क्रिप्ट देखील पायलटच्या योजनेवर अवलंबून असते. म्हणूनच टेकऑफ दरम्यान अपघात झाल्यास, विमान वाहतूक तज्ज्ञ प्रथम पायलटच्या निर्णयाची आणि प्रतिक्रियेची तपासणी करत असतात. तसेच खराब हवामानामुळे टेकऑफ दरम्यान विमान अपघात होण्याची कारणे पुढे आलेली आहेत. टेकऑफ दरम्यान जोरदार वारे, गडगडाट, कमी दृश्यमानता किंवा मायक्रोबर्स्ट ही अपघातांची प्रमुख कारणे असतात. इंजिनमध्ये समस्या असल्यास, पक्षी आदळल्यास किंवा सिस्टममध्ये बिघाड झाल्यास, पायलटला काही सेकंदांत निर्णय घ्यावा लागतो की टेकऑफ सुरू ठेवायचे की धावपट्टीवर विमानाला काही प्रकारे थांबवण्याचा प्रयत्न करायचा.

अहमदाबाद विमान दुर्घटनेतील पायलट सुमित सबरवाल हा सुद्धा आज जगात नाही. नक्की काय घडले हे आता सांगता येणार नसले तरी, ज्या पद्धतीने गेल्या काही वर्षांत विमान प्रवाशांची संख्या वाढलेली आहे. ते पाहता, भविष्यात अपघात होऊ नये यासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग मोठ्या प्रमाणावर व्हायला हवा. जीवाची किंमत मोठी आहे. एका क्षणार्धात होत्याचे नव्हते... असे एका विमान अपघातातून घडू शकते. अपघात टाळण्यासाठी विमान कंपन्यांबरोबर केंद्र सरकारनेही अधिक लक्ष घालायला हवे.

# जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी शिक्षकांच्या बदल्या करु नये .. ताहीर बेग मिर्झा

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------



मा सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार चार महिन्यांत स्थानिक स्वराज्य संस्था जिल्हा परिषद पंचायत समिती सदस्या च्या निवडणूक घ्या त्यानुसार महाराष्ट्रातील ३२ जिल्हा परिषद व ३३६ पंचायत समितीच्या निवडणुक घ्या त्यानुसार जिल्हा परिषद व पंचायत समिती च्या निवडणूक होणार आहे तरी शिक्षकांच्या व इतर कर्मचार्याच्या बदल्या करु नये अशी मागणी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उप मुख्यमंत्री अजित पवार व निवडणूक आयोग महाराष्ट्र यांच्या कडे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अल्पसंख्याक विभागाचे राष्ट्रीय सरचिटणीस तथा निजामपूर ग्रामपालिकेचे सदस्य ताहीर बेग मिर्झा यांनी केली आहे याबाबत निवेदन म्हटले की सन२०२५ मध्ये ३२ जिल्हा परिषद ३३६ पंचायत समिती च्या सार्वत्रिक २५ चे कार्यक्रम जाहीर झाले आहे. ग्रामविकास मंत्रालयाने दिनांक १२ जुन रोजी परिपत्रक काढून जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २५ च्या सदस्य संख्या प्रभाग रचना करण्याचे आदेश दिले आहेत तरी निवडणूक आक्टोबर नोव्हेंबर महिन्यात होण्याची शक्यता आहे तरी निवडणूक साठी जिल्हा परिषद शिक्षकांचे व इतर कर्मचार्याच्या बदल्या निवडणुक होईल पर्यंत करण्यात येऊ नये व बदल्या रद्द करण्यात यावे अशी मागणी मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री निवडणुक आयोग महाराष्ट्र यांच्या कडे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अल्पसंख्याक विभागाचे राष्ट्रीय सरचिटणीस ताहीर बेग मिर्झा यांनी केली आहे

# पू. साने गुरुजींच्या ७५ व्या स्मृतिदिनी धुळे राष्ट्रसेवा दलातर्फे अभिवादन

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------



मातृ हृदयी साहित्यिक माय माऊली स्वातंत्र्य सेनानी पूज्य साने गुरुजी यांच्या ७५ व्या स्मृतिदिनानिमित्त धुळे महानगर राष्ट्रसेवा दलाच्या वतीने गरुड वाचनालयामागे आयोजित कार्यक्रमात अभिवादन करण्यात आले. ज्येष्ठ राष्ट्रसेवा दल साथी बापू ठाकूर व निवृत्त फौजी तुकाराम शेंडे यांच्या हस्ते गुरुजींच्या प्रतिमेस माल्यार्पण करण्यात आले. ज्येष्ठ साथी रमेश पवार यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करताना गुरुजींच्या कार्याला उजाळा दिला. याचवेळी इचलकरंजी येथील राष्ट्रसेवाच्या कार्याध्यक्ष इंद्रायणी पाटील लिखित राष्ट्रसेवादल स्थापनादिनानिमित्त "अव्याहत सेवेची ८४ वर्ष "या प्रदीर्घ लेखाचे सामूहिक वाचन केले गेले. एस आर वाणी सर यांनी आपल्या सुमधुर आवाजात साने गुरुजी व कवी वसंत बापट यांची सेवादल गीते, ध्येय गीते, व समता गीते सादर केली आणि सामूहिकरित्या म्हणण्यात आली. ज्येष्ठ साथी दीपक भाई परदेशी, दत्ताजी बागुल, तुकाराम शेंडे, रामदास जगताप , रमेश सावंत, नितीन माने , डॉ. पापालाल पवार आदींनी सेवादल शाखेवरील जुन्या स्मृतींना उजाळा दिला. बालसाथी रुपेश भास्कर पाटील याने बालकांसाठी साने गुरुजींचे योगदान याविषयी माहिती दिली. तासभर चाललेल्या सुटसुटीत कार्यक्रमाचे नियोजनात सर्वच उपस्थित सैनिकांनी लोकशाही समाजवाद , धर्मनिरपेक्षता, विज्ञाननिष्ठा ,श्रमप्रतिष्ठा या सेवा दलाच्या पंचसूत्रीचा प्रचार प्रसार करण्याचा निर्धार केला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महानगर कार्याध्यक्ष महेश बोरसे पैलवान ,ज्येष्ठ साथी रमेश पाकड , विजय महाले, भास्कर बापू पाटील, महेंद्र शिरपूरकर, साखरलाल देसले, गोपी लांडगे , आदींनी परिश्रम घेतले कार्यक्रमास बहुसंख्य साथी उपस्थित होते.

अल्पावधीत संपूर्ण महाराष्ट्रात लोकप्रिय झालेल्या
दैनिक स्वराज्यदूत
या वृत्त पत्रामध्ये वार्ताहर, जाहिरात प्रतिनिधी, गाव, तालुका
तसेच जिल्हा पातळीवर काम करण्याची सुवर्ण संधी
आजच संपर्क करा ८४४६६७३६७७

# बच्चूभाऊंचा अन्नत्याग, सरकारला जमालगोटा

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------------------

प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक अध्यक्ष माजी राज्यमंत्री ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू यांनी शेतकरी, शेतमजूर, दिव्यांग, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, मेंढपाळ, बेघर, कामगार इत्यादी असंघटीतांच्या प्रश्नावर गुरूकुंज मोझरी येथे रविवारपासून (ता. आठ जून) अन्नत्याग आंदोलन सुरू केलेले आहे. सरकारने एकतर मागण्या मंजूर कराव्यात, अन्यथा आमच्या अंत्यसंस्काराची तयारी करावी, या परखड शब्दात सरकारला इशारा दिलेला आहे. बच्चूभाऊ कडू यांच्या अन्यत्याग आंदोलनाची दखल सरकारला घ्यावीच लागेल. अन्यथा सरकारचीच अंत्ययात्रा निघणे अटळ आहे.

सरकारकडून शेतकर्यांच्या डोक्यात जात पेरली जात आहे. शेतकरी वेगवेगळ्या पक्षात विखुरलेले गेलेले आहेत. म्हणूनच शेतमालाला भाव मिळत नाही, तरी शेतकरी बोलत नाही, हे बच्चू कडू यांचे विधान त्यांच्या लढ्याचे उद्दीष्ट सांगणारे आहे. शेतकर्यांचे पंचप्राण शरद जोशी यांच्या निर्वाणानंतर राज्यातील शेतकरी सैरभैर झालेला आहे. शेतकरी नेतृत्वाची पोकळी भरून काढण्याचा प्रयत्न विविध भागातील नेते आपापल्या परिने करीत आहेत. मात्र त्यांच्या प्रयत्नांना पाहिजे तो प्रतिसाद शेतकर्यांकडून अद्यापपर्यत मिळालेला नाही. त्याचे कारण विश्वाहार्यता आहे. "मै नही झुकेंगा", यावर अटल राहत बच्चू कडू यांनी सुरूवातीपासून शेतकरी व दिव्यांगांचा कैवार घेतलेला आहे. राज्यमंत्री असताना शेतकरी आंदोलनाच्या समर्थनार्थ त्यांनी दिल्लीपर्यंत रॅलीद्वारे धडक दिली होती. त्यांच्यात ती विश्वासहार्यता शेतकऱ्यांना दिसत आहे. ते वर्षानुवर्षापासून शेतकर्यांच्या प्रश्नावर लढत आहेत. त्यांनी कित्येकदा सभागृह दणाणून सोडलेले आहे. सरकारला वेळोवेळी त्यांच्या मागण्यांपुढे झुकावे लागलेले आहे. दिव्यांगासाठी मंत्रालय ही त्याचीच फलश्रृती आहे. निवडणुकीदरम्यान सरकारने कर्जमाफीचे दिलेले आश्वासन पूर्ण करण्यासाठीची मागणी बच्चूभाऊ कडू यांनी आता रेटून धरलेली आहे.

सरकार कोणाचेही असो, ते गेंड्याच्या कातडीचे असते. सरकारी यंत्रणा ही हत्तीसारखी बसलेली असते. तिला वारंवार हलवावे लागते. एवढे करूनही ती कासवगतीने चालते. बच्चू कडू हे गुवाहाटी प्रवासानंतर गठीत झालेल्या सरकारचा एक भाग राहिलेले आहे. त्या "कल्चर"चा कारभार कसा चालतो, हा त्यांनीसुद्धा जवळून अनुभवलेला आहे. ज्यांच्या हातात सत्ता असते, आधी ते 'आपलं काय', हे बघत असतात. जनतेचे प्रश्न कितीही गंभीर असो, त्यांच्यासाठी जीवनमरणाचे असोत, त्याकडे लक्ष देण्यास सरकारला सवड नसते. जनता निवेदन देऊन, मोर्चे काढून, आंदोलन करून सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करीत असते, पण शासन-प्रशासन त्याचे गांभीर्य लक्षात घेत नाही. जेव्हा उद्रेक व्हायला लागतो, जनमत विरोधात जायला लागते, सरकारी यंत्रणेच्या पायाखालची वाळू सरकायला लागते, तेव्हा कर्तव्यावरून सरकलेले सरकार जागेवर येण्याचा प्रयत्न करीत असते. याहीवेळी सरकारला गुरूकुंजात गुडघे टेकवावे लागतील. अप्रतिष्ठा म्हणून नाही तर लोकांच्या जीवनमरणाचा प्रश्न समजून सरकारला झुकावे लागणार आहे.




बच्चू कडे हे त्यांच्या अनोख्या आंदोलनांसाठी राज्यभर प्रसिद्ध आहेत. यापूर्वी त्यांनी नागपूरात "शोले स्टाईल" आंदोलन केले, तेव्हा तत्कालिन गृहमंत्री आर. आर. आबा पाटील यांना जलकुंभाच्या शेकडो पायर्या चढून बच्चू कडू यांची मागणी समजून घ्यावी लागली होती. तत्कालिन वित्त व नियोजन राज्यमंत्री डॉ. सुनील देशमुख पाण्याच्या टाकीवरील त्या चर्चेचे साक्षीदार आहेत. आता बच्चूभाऊ कडू यांनी शेतकरी, शेतमजूर, दिव्यांग, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, मेंढपाळ, बेघर, कामगार या असंघटीत क्षेत्रातील सर्वसामान्यांच्या प्रश्नावर सरकारविरोधात नियोजनपूर्वक निर्णायक लढा उभारलेला आहे. त्यासाठी आपल्या प्राणाची बाजी लावलेली आहे. अन्ना हजारे यांच्या आंदोलनासारखी या आंदोलनाची ते दुर्दशा निश्चितच होऊ देणार नाही. त्यासाठी त्यांचे असंख्य कार्यकर्ते कामाला लागलेले आहेत.

बच्चू कडू यांच्या अन्नत्याग आंदोलनाच्या समर्थनार्थ त्यांचे असंख्य 'धनाजी-संताजी' विश्रोळीच्या धरणात जलसमाधीसाठी उतरलेले आहेत. चांदूरबाजार येथे मुंडन व बुधवारपासून चुलबंद आंदोलन होत आहे. एवढच नव्हे तर राष्ट्रीय शेतकरी नेते राकेश टिकैत गुरूकुंज मोझरीत डेरेदाखल झालेले आहेत. शिवसेना पक्षप्रमुख माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, खासदार संजय राऊत, स्वाभीमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष माजी खासदार राजू शेट्टी, रविकांत तुपकर, आमदार रोहित पवार, आमदार गजानन लवटे, धाराशिवचे खासदार ओमराजे निंबाळकर, आमदार कैलास पाटील, आमदार नितीन बापू देशमुख, विश्वजित कदम, प्रकाशदादा सोळंके, लक्ष्मण हाके, मनोज जरांगे, यांनी बच्चू कडू यांच्या आंदोलनास पाठींबा दिलेला आहे. त्यापैकी कित्येक नेते स्वतः पाठींबा देण्यासाठी गुरूकुंज मोझरीत येत आहेत.

त्याशिवाय अन्य नेते भेटीला येण्याचा व आंदोलनाला पाठिंबा देण्याचा 'सिलसिला' हा आंदोलनाची सांगता होईपर्यंत चालत राहणार आहे.

निवडणुकीच्या तोंडावर महिलांना लाडक्या बहिणी संबोधून त्यांना महिन्याकाठी दीड हजार रुपये देऊन उदारपणा दाखविणार्या सरकारकडे शेतकर्यांचे कर्ज फेडण्यासाठी किंवा असंघटीतांचे प्रश्न सोडविण्यासाठी पैसे नाही, असे होऊ शकत नाही. उद्धव सरकारने यापूर्वी शेतकर्यांची कर्जमाफी केली होती, एवढेच नव्हे तर शेतकर्यांकडे असलेले नोंदणीकृत सावकारांचे कर्ज देखील फेडले होते. लोकसभेत हादरा बसल्यानंतर विधानसभा निवडणुकीला सामोरे जाताना सरकारने वार्षिक ३० ते ३५ हजार कोटींची लाडकी बहिण योजना आणली, त्याचदरम्यान शेतकर्यांची कर्जमाफी करून असेही आश्वासन दिले होते. आता त्या आश्वासनाची पूर्तता व्हावी, एवढेच बच्चू कडू यांचे या आंदोलनाच्या माध्यमातून म्हणणे आहे. ते गैर कसे होऊ शकते? शेतकर्यांची कर्जमाफी करू, हे आश्वासन कोणी दिले होते, असाही प्रश्न दस्तुरखुद्द सत्ताधार्यांनीच उपस्थित केलेला आहे. एकवेळ तसे आश्वासन कुणी दिलेले नसले तरी ती एक मोठया सर्वसामान्य वर्गाची मागणी आहे, हे सरकारला विसरून चालणार नाही.

बच्चू कडू यांचे अन्नत्याग आंदोलन हा असंघटीतांचा, संघटीतांच्या सरकारवर मोठा प्रहार आहे. सरकारसाठी मोठा जमालगोटा आहे. सरकारला रक्षात्मक मोडवर येण्याशिवाय पर्याय नाही. आंदोलनाची भूमि असलेल्या जिल्ह्यात आणि जीवनाची मार्गदर्शक तत्त्व देणार्या राष्ट्रसंतांच्या भूमित हे आंदोलन होत आहे. दिल्लीतील अरविंद केजरीवाल, अण्णा हजारे यांचे अथवा शेतकरी आंदोलन चिरडून काढण्याऐवढं हे आंदोलन सरकारसाठी सोपे नाही. एक तर मागण्या मान्य करा, नाहीतर... माझ्या अंत्ययात्रेची तयारी करा, असे बच्चू कडू यांनी आंदोलन सुरू करताना स्पष्ट केलेले आहे. त्यामुळे आता सरकारपुढेसुद्धा "करो या मरो", याशिवाय पर्याय राहिलेला नाही. बच्चू कडू यांची अंत्ययात्रा निघणार नाहीच आणि सरकारला ती काढणे परवडणार पण नाही. जर अशी वेळ आली तर सरकारची अंत्ययात्रा राज्यातून निघाल्याशिवाय राहणार नाही. सरकारने बच्चू कडू यांचा अवतार बघावा, त्यांच्या चेहर्याचा बदललेला लूक बघावा, केशरचना बघावी, तो वरून वैराग्यत्वाकडे जाण्यासारखा दिसत असला तरी त्यात ज्वालामुखी दडलेला आहे की नाही, याची खातरजमा करावी. जागो सरकार जागो!

# वनमजूर आत्मदहन प्रकरणात आरोपी वनपाल सागर पाटील यांचे निलंबन न करता बदली; प्रशासनाच्या भूमिकेवर संतापाची लाट

प्रविण काकुस्ते
पिंपळनेर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

-------------------------------

सटाणा तालुक्यातील ताहराबाद येथील वनपरिक्षेत्र कार्यालयात २६ जानेवारी २०२५ रोजी रोजंदारीवर कार्यरत असलेल्या वनमजूर राजेंद्र साळुंखे (वय ४२) यांनी कार्यालयातच आत्मदहन करून आत्महत्या केली. मृत्यूपूर्व जबाबात त्यांनी तिथल्या वनपाल सागर पाटील यांच्याकडून मानसिक छळ झाल्याचा आरोप केला होता. या गंभीर प्रकरणात जायखेडा पोलीस ठाण्यात भारतीय दंड विधानाच्या कलम १०८, ३५२, ३५१(१)(२) अंतर्गत गुन्हा दाखल असूनही, पाटील यांना निलंबित न करता धुळे वनवृत्तात बदली करण्यात आली आहे. यामुळे संपूर्ण बागलाण तालुक्यात संतापाची लाट उसळली आहे.



एका अतिशय संवेदनशील प्रकरणात आरोपी असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यावर नियमाप्रमाणे खातेनिहाय चौकशी करून कारवाई न करता, उलट त्याला हव्या असलेल्या ठिकाणी बदली देऊन वनविभागाने वनमजूर आत्मदहन प्रकरणाची हवाच काढून टाकली आहे. याबाबत वनमंत्री गणेश नाईक यांना समक्ष भेटून वस्तुस्थिती मांडणार आहे.
**रवींद्रकुमार जाधव, सामाजिक विश्लेषक**

### कोर्टाचा दखल, पण प्रशासनाची दुर्लक्षवृत्ती

पाटील यांचा जामीन अर्ज मालेगाव व





नाशिक येथील सत्र न्यायालयांनी फेटाळला असून, सध्या त्यांच्या जामिनाची याचिका उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. ते अद्याप फरार असतानाही वनविभागाने त्यांच्या विनंतीवरून त्यांची बदली मंजूर केली. या निर्णयामुळे प्रशासनाची भूमिका संशयास्पद ठरत आहे.

### चौकशी समितीच्या अहवालाकडे दुर्लक्ष

वनविभागाने नियुक्त केलेल्या त्रिसदस्यीय चौकशी समितीने सादर केलेल्या अहवालात पाटील यांच्यावर गंभीर स्वरूपाचे आरोप सिद्ध झाल्याचे स्पष्ट करण्यात आले होते. एवढे असूनही, त्यांना आधी रजा मंजूर करून नंतर त्यांच्या पसंतीच्या ठिकाणी बदली करण्यात आली. या प्रकारामुळे विभागाच्या नैतिकतेवर आणि पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

### सामाजिक क्षेत्रात तीव्र प्रतिक्रिया

सामाजिक विश्लेषक रवींद्रकुमार जाधव यांनी वनविभागाच्या भूमिकेवर टीका करताना सांगितले, "अत्यंत संवेदनशील प्रकरणात आरोपीला निलंबित न करता बदली करणे म्हणजे कायद्या आणि नैतिकतेची थट्टा आहे. यामागे राजकीय दबाव असल्याची शक्यता असून, सागर पाटील हे आमदार मंगेश चव्हाण यांचे नातेवाईक असल्याचा आरोप खुद्द प्रशासनातील अधिकाऱ्यांनी केला आहे."

### नागरिकांच्या प्रमुख मागण्या

स्थानिक नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि काही राजकीय प्रतिनिधींनी पुढील मागण्या केल्या आहेत:

१. आरोपी वनपाल सागर पाटील यांचे तात्काळ निलंबन करण्यात यावे.
२. प्रकरणाची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करण्यात यावी.
३. दोषी अधिकाऱ्यांवर प्रशासकीय आणि कायदेशीर कारवाई व्हावी.
४. दिवंगत वनमजूर राजेंद्र साळुंखे यांच्या कुटुंबाला योग्य नुकसानभरपाई द्यावी.

### शासकीय यंत्रणेवर अविश्वास

या प्रकरणामुळे बागलाण तालुक्यात वनविभागाच्या कार्यपद्धतीबाबत तीव्र नाराजी पसरली आहे. साळुंखे यांची आत्महत्या ही केवळ वैयक्तिक घटना नसून, शासकीय दडपशाही, अपारदर्शकता आणि बेजबाबदारपणाचे प्रतीक ठरली आहे. या घटनेचा सर्वसमावेशक, पारदर्शक आणि न्यायाधारित तपास करण्यात यावा, अशी जनतेची ठाम मागणी आहे.

# किसानांची लूट थांबवा – मार्केटिंग फेडरेशनने ५० लाख क्विंटल धान खरेदी करावी : भारतीय कम्युनिस्ट पार्टीची मागणी

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

--------------------

यंदाच्या रब्बी हंगामात धानाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर झाले असताना देखील, मार्केटिंग फेडरेशनने केवळ ११ लाख क्विंटल धान खरेदीचे लक्ष्य ठेवल्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर लूट सुरू आहे, असा आरोप भारतीय कम्युनिस्ट पार्टी व महाराष्ट्र राज्य किसान सभेने केला आहे. शेतकरी जेव्हा



बाजारात धान विक्रीसाठी येतो, तेव्हा व्यापारी १७०० रुपये प्रति क्विंटलच्या पुढे दर देण्यास तयार नसतात. यामुळे शेतकऱ्यांना उत्पादन खर्चही परवडत नाही, अशी गंभीर स्थिती निर्माण झाली आहे. भारतीय कम्युनिस्ट पार्टीचे महाराष्ट्र राज्य कार्यकारिणी सदस्य कॉ. हौसलाल रहांगडाले, जिल्हा सचिव कॉ. मिलींद गणवीर, जिल्हा अध्यक्ष कॉ. करूणा गणवीर व महाराष्ट्र राज्य किसान सभेचे जिल्हा सचिव कॉ. रामचंद्र पाटील यांनी संयुक्त पत्रकार परिषदेत शासनाकडे मागणी केली की, मार्केटिंग फेडरेशनला ५० लाख क्विंटल धान खरेदीची तात्काळ मान्यता द्यावी. "शेतकऱ्यांची लूट थांबवण्यासाठी आणि त्यांना योग्य हमीभाव मिळावा यासाठी सरकारने हस्तक्षेप करावा. अन्यथा लवकरच तीव्र आंदोलन छेडले जाईल," असा इशारा कॉ. हौसलाल रहांगडाले यांनी दिला.

# शिरूरमध्ये मोटारसायकल चोरटा गजाआड; पाच गुन्ह्यांचा छडा, पोलिसांची धडाकेबाज कारवाई

फिरोज सिकलकर
शिरूर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------

शिरूर शहरामध्ये मोटारसायकल चोरीचे सत्र सुरू असतानाच स्थानिक पोलिसांनी धडक कारवाई करत एका सराईत चोरट्याला अटक केली असून, त्याच्याकडून पाच गुन्ह्यांचा छडा लावण्यात पोलिसांना यश आले आहे. शिरूर पोलिसांच्या तपास पथकाने केलेल्या या कारवाईमुळे शहरातील नागरिकांमध्ये दिलासा निर्माण झाला आहे. दिनांक १५ मे २०२५ रोजी शिरूर येथील गुजरमळा परिसरातील डॉक्टर राम मगर यांच्या बांधकामस्थळी ठेवलेले ६५,००० रुपये किंमतीचे लोखंडी साहित्य अज्ञात चोरट्याने चोरल्याच्या




प्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं. ३३७/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) अंतर्गत नोंद करण्यात आली होती. शहरात वाढत्या चोरीच्या घटना लक्षात घेता, पोलीस निरीक्षक श्री. संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शुभम चव्हाण आणि त्यांच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण व सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास सुरू केला. तपासादरम्यान आरोपी आर्यन एअरपोस पवार (रा. शिंदेवाडी, आष्टापुर सध्या रा. पाण्याच्या टाकीजवळ, शिरूर) याला अटक करण्यात आली. पोलीस कोठडीत असताना त्याने साथीदार रोहित भोसले (रा. पाण्याच्या टाकीजवळ, शिरूर) याच्या मदतीने शिरूर शहरात मे महिन्यात चार मोटारसायकल चोरी केल्याची कबुली दिली. यामध्ये खालील गुन्ह्यांचा समावेश आहे या सर्व गुन्ह्यांमध्ये चोरीस गेलेल्या मोटारसायकल्स जप्त करण्यात आल्या आहेत.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक श्री. संदीप गिल, अप्पर पोलीस अधीक्षक श्री. रमेश चोपडे, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. प्रशांत ढोले व पोलीस निरीक्षक श्री. संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत पो.उ.नि. शुभम चव्हाण, पो.ह. नाथसाहेब जगताप, अक्षय कळमकर, पो.अं. नितेश थोरात, विजय शिंदे, निरज पिसाळ, सचिन भोई, निखील रावडे, रवि काळे, रविंद्र आव्हाड, अजय पाटील यांच्या तपास पथकाचा मोलाचा सहभाग होता. शहरात चोरीच्या घटनांवर नियंत्रण मिळवण्यात आलेली ही कारवाई महत्त्वाची ठरत असून पोलिसांच्या तत्परतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# गोंदिया-तिरोडा राष्ट्रीय महामार्गाचा भोंगळ कारभार उघड – पहिल्याच पावसात रस्ता खचला, भीम क्रांतीकडून उच्चस्तरीय चौकशीची जोरदार मागणी

देवेन्द्र दमाहे
गोदिया जिल्हा प्रतिनिधि
दैनिक स्वराज्यदूत

-------------------------

कोट्यवधी रुपयांच्या निधीतून बांधण्यात आलेला गोंदिया-तिरोडा राष्ट्रीय महामार्ग पहिल्याच पावसात खचू लागला आहे. जागोजागी मोठमोठे खड्डे पडल्यामुळे अपघातांची मालिका सुरू असून, लोकांच्या संतापाला उधाण आले आहे. या भोंगळ कामगिरीमुळे शासन यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर मोठा प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर भीम क्रांती संघटनेकडून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात येणार असून, संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात





आली आहे. संघटनेचे मनीष गजबीये, अमित मेश्राम, कबीर सुखदेवे, श्याम बाबा आदींनी यासंदर्भात शासनाचा जाब विचारला आहे. "महसूल खर्चाच्या नावाखाली कोट्यवधी रुपये खर्च करून तयार करण्यात आलेल्या रस्त्यांची अवस्था पहिल्याच पावसात ढासळत असेल, तर यामागे भ्रष्टाचार आणि ठेकेदार-अधिकाऱ्यांची मिलीभगत स्पष्टपणे दिसून येते," असा आरोप संघटनेकडून करण्यात आला आहे. या रस्त्यावर मागील काही महिन्यांत अनेक अपघात घडले आहेत. तरीदेखील प्रशासन दुर्लक्ष करत असल्याची लोकांची भावना आहे. हा केवळ रस्ता खराब झाल्याचा मुद्दा नाही — हा जनतेच्या सुरक्षिततेचा, सार्वजनिक निधीच्या अपव्यासंबंधीचा आणि शासनाच्या नाकर्तेपणाचा गंभीर मुद्दा आहे. राज्य सरकार याची गंभीर दखल घेणार का, की पुन्हा एखाद्या फाईलमध्ये ही तक्रार धूळ खात पडून राहणार? जनता उत्तर मागतेय — आणि आता हे होणार बेधडक!

# शेतकरी-दिव्यांगांसाठी थेट शमशानभूमीत 'प्रहार' चे अन्नत्याग आंदोलन!

देवेन्द्र दमाहे
गोदिया जिला प्रतिनिधि
दैनिक स्वराज्यदुत

-----------------------------

तिरोडा तालुका शेतकरी, दिव्यांग आणि भूमिहीन मजुरांच्या हक्कासाठी आता लढा थेट शमशानभूमीत! प्रहार जनशक्ती पक्षानं आपल्या प्रखर आंदोलनशैलीची परंपरा कायम ठेवत, नवेझरी (ता. तिरोडा) येथील स्मशानभूमीत १० जूनपासून अन्नत्याग आंदोलन सुरू केलं आहे.

"सरकार झोपेत आहे, म्हणून आम्ही शमशानात जागे आहोत!" — अशा संतप्त भावना या आंदोलनातून व्यक्त होत आहेत.



### प्रमुख मागण्या

शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळावी
दिव्यांगांना दरमहा ₹६,००० मानधन द्यावे
पेरणी ते कापणीपर्यंतची कामं NREGA अंतर्गत घ्यावीत
भूमिहीन मजुरांना ₹५ लाख अपघात विमा मिळावा
कोयलारी आश्रमशाळा दुर्घटनेची चौकशी आणि पीडितांना आर्थिक मदत मिळावी
ओव्हरलोड कोळसा व राख वाहतूक बंद व्हावी
माविमच्या महिला CRP व लेखापाल यांचं मानधन वाढवावं
जि.प. योग शिक्षकांना मानधन निधी तत्काळ द्यावा

### शासन ठोस निर्णय घेईपर्यंत माघार नाही!

प्रहार जिल्हाध्यक्ष महेंद्र भांडारकर यांच्या नेतृत्वात हे आंदोलन सुरू असून, शेतकरी, दिव्यांग, महिला, व भूमिहीन कामगार मोठ्या संख्येनं सहभागी झाले आहेत. यावेळी दीक्षा विजय पटले हिने शेतकऱ्यांच्या मुलींच्या व्यथा मांडत, शासनाच्या बेपर्वाईवर खरमरीत टीका केली.

"आता केवळ घोषणा नकोत, निर्णय हवेत! नाहीतर आंदोलन शमशानात का, पण सत्ताधाऱ्यांच्या दारातही पोहोचेल!"

# शिरूर बस आगारात पाच नव्या एस.टी. बसेस दाखल; आमदार आबा कटके यांच्या हस्ते झाले पूजन

फिरोज सिकलकर
शिरूर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------

शिरूर बस आगारासाठी नव्याने पाच एस.टी. बसेस उपलब्ध करण्यात आल्या असून या बसेसचे पूजन आमदार माऊली (आबा) कटके यांच्या हस्ते पार पडले. या कार्यक्रमात बस आगार प्रमुख मनिषा इनामके (गायकवाड) यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाला माजी जिल्हा परिषद सभापती मंगलदास बांदल, दादासाहेब कोळपे, भाजपाचे तालुकाध्यक्ष राहुल पाचर्णे, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष रवींद्र काळे, बाजार समितीचे माजी सभापती शशिकांत दसगुडे, माजी उपनगराध्यक्ष जाकिरखान पठाण, महेश ढमढेरे, श्रुतिका झाबरे, प्रिया बिरादार, सामाजिक कार्यकर्ते प्रीतेश फुलडाळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे





शहराध्यक्ष शरद कालेवार, तृप्ती सरोदे, शिवसेनेचे खुशाल गाडे, भाजपाचे विजय नरके, राजेंद्र महाजन, नीलेश नवले, माजी नगरसेविका माया गायकवाड, सुनील जाधव, अविनाश मल्लाव आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना आमदार कटके यांनी सांगितले की, ज्या भागात एस.टी. सेवा आवश्यक आहे त्या ठिकाणी सेवा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. तसेच शिरूर आगाराला अधिक मनुष्यबळ व नवीन बसेस मिळवून देण्यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा केला जाईल. विविध बस आगारांना नवीन बसेस उपलब्ध करून शासनाने विकास प्रक्रियेला चालना दिल्याचे ते म्हणाले. शहराच्या विकासासाठी आराखडा तयार करण्यात आला असून शिरूर नगरपालिकेला विविध कामांसाठी ३६ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला

आहे. शिरूर नगरपालिका आदर्श ठरेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. शिरूर बस आगारातील बीओटी संदर्भातील भ्रष्टाचाराची चौकशी करण्याची मागणी विधानसभा अधिवेशनात करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमात ग्रामीण भागात बंद झालेल्या एस.टी. फेऱ्या पुन्हा सुरू करणे, बाबूराव नगर व शिरूर पंचक्रोशीत एस.टी. अथवा पीएमपीएल बससेवा सुरू करणे, बसस्थानकातील चोरीच्या घटनांमुळे पोलिस बंदोबस्त वाढवणे, व आणखी बसेस उपलब्ध करून देण्याच्या मागण्या करण्यात आल्या. मंगलदास बांदल, शशिकांत दसगुडे, रवींद्र काळे, राहुल पाचर्णे, श्रीनिवास घाडगे, माजी पंचायत समिती सदस्य रामभाऊ कदम, प्रकाश थोरात, समीर झगडे, राजेंद्र कोरेकर, तृप्ती सरोदे यांची मनोगतेही यावेळी व्यक्त झाली.

This Daily SWARAJYADOOT is Printed, published and owned by BHASKAR GORAKH DEORE and printed at Jijau graphics and offset printers, near mahabij office, ramkrushna nagar, bhaxi road, Satana, Tal- Baglan, Dist- Nashik, Pin-423301 and published at Head office daily SWARAJYADOOT, flat No. 102, Sumangal heights, Siddhivinayak colony, khande nagar, Nashik, Maharashtra - 422008. Editor Shri. Bhaskar Gorakh Deore

# १५ जून मल्लखांब दिन

# मल्लखांब एक शाश्वत क्रीडाप्रकार





मल्लखांब हा एक प्राचीन खेळ असून जर्मनीतील कलोन नावाच्या युनिव्हर्सिटीत बाराशे खेळाडूंवर संशोधन केल्यानंतर असे सिद्ध झाले की कमीत कमी वेळात संपूर्ण शरीराला जास्तीत जास्त व्यायाम देणारा जगातील एकमेव क्रीडा प्रकार म्हणजे मल्लखांब होय. भारताच्या परंपरा आणि सांस्कृतिक रचनेनुसार जन्मलेला मल्लखांब हा खेळ जगभरातील लोकांच्या कल्पनाशक्तीला आकर्षित करत आहे आणि तो अजूनही भरभराटीला येत आहे शारीरिक कौशल्य, मानसिक शिस्त आणि सांस्कृतिक महत्त्व यांचे अद्वितीय मिश्रण त्याला एक उल्लेखनीय आणि टिकाऊ क्रीडा प्रकार बनवते. सर्वांसाठी "मल्लखांब"हा- खेळ फक्त तरुणांसाठी मर्यादित नाही तर तो सर्व वयोगटांसाठी आहे जरी तो शारीरिक दृष्ट्या कठीण असला तरी विविध वयोगटातील सराव करणारे त्यांच्या क्षमता नुसार त्यांचे प्रशिक्षण अनुकूल करू शकतात ही समावेशकता समुदायाची भावना निर्माण करते आणि व्यक्तीला निरोगी आणि सक्रिय जीवनशैली स्वीकारण्यास प्रोत्साहित करते. मल्लखांब एक मनमोहक खेळ असून जो अखंडपणे सामर्थ्य संतुलन लवचिकपणा या घटकांचे मिश्रण यात आढळते मल्लखांबाचे एक आगळे वेगळे वैशिष्ट्य म्हणजे मल्लखांब हा इतर खेळांपेक्षा वेगळा आहे. मल्लखांबाला एक शाश्वत लोकप्रियता आणि सांस्कृतिक महत्त्व शारीरिक तंदुरुस्तीच्या पलीकडे आहे . मल्लखांबाची उत्पत्ती १२ व्या शतकात म्हणजेच सोमेश्वर चालुक्याने लिहिलेल्या ११३५ मध्ये मानस उल्हास या ग्रंथांमध्ये आढळते. मल्लखांबाचे आद्य जनक गुरुवर्य बाळंबट दादा देवधर यांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील कोठुरे या गावी झाला बाळूंबट दादा देवधर यांनी मलखांबाला नवसंजीवनी प्राप्त करून दिली. मल्लखांब म्हणजे मल्ल आणि खांब म्हणजे लाकडी पोल पारंपारिक भारतीय कुस्तीशी मल्लखांबाची जवळीकता आहे कुस्तीगिरांना त्यांची ताकद वाढवण्यासाठी व चपळतेसाठी मलखांब एक महत्त्वपूर्ण साधन आहे मलखांबाने शरीरातील चपळता, लवचिकपणा, स्नायू बळकटी वाढते मल्लखांबावर केलेल्या आढी आणि तेढीने गुरुत्वाकर्षणा विरुद्ध शरीराचा तोल कसा साधता येईल आणि शारीरिक संतुलन त्याचप्रमाणे शारीरिक बळकटीचा विकास कसा करावा हे देखील समजते. मल्लखांबाच्या प्रकारांमध्ये पु रलेला मल्लखांब, रोप मल्लखांब व टांगता मल्लखांब इत्यादी प्रकार आहेत. मलखांबाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे योगा आणि जिम्नॅस्टिकचे मिश्रण यामध्ये दिसून येते कारण मल्लखांबाचा खेळाडू हा मल्लखांबावर योगासनांचा संच करतो ज्यामध्ये योगासने करताना जिम्नॅस्टिकची ताकद आणि चपळता यांचे मिश्रण केले जाते मलखांबाच्या सरावामुळे शारीरिक चपळते बरोबरच मानसिक आरोग्य देखील मिळते मल्लखांब आतील खेळाडूंमध्ये शारीरिक कौशल्य लवचिकता व शिस्तप्रियता दिसून येते. नियमितपणे मलखांबाचा सराव करणाऱ्या मलखांबपटूमध्ये ताकद हृदय रक्तवाहिन्या संबंधित असलेले व्यायाम आणि लवचिकता वाढविली जाते. मल्ल खांबाला आपल्या दिनचर्येत सहभागी केल्याने शरीर पिळदार होऊन मन एकाग्र होऊन मन आणि शरीराशी असलेले संबंध सुदृढ बनतात खेळाडू कोणत्याही दबावाखाली असेल तर शांत राहून निर्णय घेऊ शकतो ही क्षमता मलखांबा मुळे विकसित होते. मल्लखांबाला आता आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली आहे मलखांबाच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धा होतात मलखांब हा एक स्वदेशी खेळ असून मलखांबाने व्यक्तीचा सर्वांगीण शारीरिक बौद्धिक मानसिक आणि शैक्षणिक विकासाद्वारे जीवनात आत्मविश्वास निर्माण होतो.

**संकलन**
**श्री संजय बच्छाव**
**धुळे जिल्हा प्रतिनिधी**
**दैनिक स्वराज्यदूत**

मल्लखांबाचे काही स्वरूपाचे संदर्भ प्राचीन भारतीय महाकाव्यामध्ये जसे की रामायण शंकर गीतामध्ये दुसऱ्या ते पहिल्या शतकातील प्राचीन चंद्रकेतू गड, मातीची भांडी, भारतात आलेल्या बौद्ध चीनी यात्रे करून च्या वृत्तांत आढळतात लक्ष्मीबाई झाशीची राणी, तात्या टोपे, नानासाहेब, छत्रपती संभाजी राजे मलखांब खेळत असत आपले सैन्य बलाढ्य सशक्त राहावे म्हणून त्यांच्याकडून मलखांबाचा सराव करून घेतला जात असे. शारीरिक संतुलन कौशल्य शिस्त वाढवणारे प्रशिक्षण पद्धत म्हणजे गनिमी युद्धाचे प्रणेते म्हणून ओळखले जाणाऱ्या युद्ध्यांना अनुकूल होती. ऑस्ट्रेलियन गोल्ड कोस्ट येथे झालेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत मल्लखांबाचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले हा खेळ २०२० च्या टोकियो ऑलिम्पिकच्या उद्घाटन समारंभात सादर करण्यात आला २०२२ पासून खेलो एक इंडिया युथ गेम्स कार्यक्रमात मल्लखांब खेळाचा समावेश करण्यात आला मल्लखांबाच्या माध्यमातून निरोगी जीवनशैलीचा प्रचार करणे मल्लखांब मध्ये शारीरिक तंदुरुस्ती मानसिक आरोग्य आणि शिस्तीवर भर दिल्याने निरोगी जीवनशैलीला चालना मिळते अनेक अभ्यासक आणि उत्साही लोकांनी संतुलित आणि समग्र जीवन जगण्याची साधन म्हणून मलखांबाचा स्वीकार केला आहे

**मल्लखांब चे फायदे**

**लवचिकता -** गुंतागुंतीच्या हालचालींवर प्रभुत्व मिळविण्यासाठी आवश्यक असलेली गती आणि लवचिकता विकसित करता येते.

**समन्वय -** खेळाडू आपली कामगिरी करताना पडण्याचा किंवा दुखापत होण्याचा धोका कमी करून स्थिरता आणि नियंत्रण मिळवतो. विविध प्रकारचे एलिमेंट्स करण्यासाठी आवश्यक असलेली पायाभूत स्थिरता आणि आधार प्रदान करते.

**मानसिक लक्ष केंद्रित करते -** मल्लखांब एकाग्रता विकसित करताना दबावा खाली असताना सक्षम कामगिरी करता येते अधिक आत्म जागरूकता येते. काळानुसार मल्लखांब विकसित होत असताना त्याच्यासोबत इतिहास आणि परंपरेचे ओझे आहे जे त्याचे पालन करणाऱ्यांचे जीवन समृद्ध करते आणि त्याच्या सौंदर्याची साक्षीदार असलेल्यांमध्ये कौतुक निर्माण करते प्राचीन मंदिरांमध्ये आधुनिक व्यायाम शाळांमध्ये किंवा आंतरराष्ट्रीय रंगभूमीवर सादरीकरण केले असता मलखांब मानवी क्षमतेच्या शाश्वत शक्तीचा आणि सीमा काळाच्या पलीकडे जाणारा खेळांच्या उल्लेखनीय प्रवासाचा पुरावा आहे.

**डॉ. भूपेंद्र मालपुरे**
**आंतरराष्ट्रीय मल्लखांब**
**पंच/प्रशिक्षक**

# 15 जून जागतिक पितृदिन

## जीवनात प्रत्येक वादळात खंबीरपणे उभे राहणारे फक्त माय-बापच!

वडिलांचा मानसन्मान व्हावा या उद्देशाने जगात दरवर्षी जून महिन्याच्या तिसऱ्या रविवारला पितृदिन (फादर्स डे) साजरा केला जातो.त्या अनुषंगाने यावर्षी पितृदिन (फादर्स डे) १५जून २०२५ रोज रविवारला येत आहे. त्यामुळे पितृत्व आणि मातृत्व या परीभाषांशी किती जवळच आणि रक्ताच नात असते हे आपल्याला आई-वडील या शब्दावरूनच सहज समजून येते. या जगात माय-बापा शिवाय मोठा कोणीही नाही. आई-वडील, माय-बाप या शब्दाला सुध्दा कुठेही तोड नाही.कारण आई- वडील हा शब्द फक्त मानवजाती पुरताच सीमित नसून संपूर्ण जीवसृष्टी, पशुपक्षी या शब्दाशी घनिष्ठ व निगडित आहे. तेव्हाच आपल्याला उत्पत्ती,संस्कार,संस्कृती,जडण-घडण सर्वत्र दिसून येते. ज्याप्रमाणे आई-वडील मुलांची जोपासना करते. त्याचप्रमाणे पशुपक्षी व संपूर्ण जीवसृष्टी आपल्या पिल्लांची (मुलांची) जोपासना करून लहाण्याचे मोठे करतात. ही ईश्वरी देणच आहे.त्यामुळे या जगात आई-वडीला पेक्षा कोणीही मोठा नाही.कारण वडीलांवर आपल्या मुलांचीच नाही तर संपूर्ण कुटुंबाची मोठी जबाबदारी असते.त्यामुळे आर्थिकदृष्ट्या व इतर बाबतीत सुरक्षेची ढाल बनून वडील आपले कार्य तत्परतेने करीत असतो.त्यामुळे आई-वडीलांची भुमिका समान असते.आई नेहमी मायेच पांघरूण घालत असते तर वडील पहाडासारखा संपूर्ण कुटुंबाची रक्षा करून सुरक्षा कवचची भुमिका निभवत असतो.सर्वांनीच आई- वडीलांची सेवा व सन्मान करायला हवा.वडीलांचा मानसन्मान करून पितृ दिवस हा तर दररोज साजरा करायला पाहिजेच. परंतु जगाला जान रहावी म्हणून ठराविक दिवशी पितृ दिनाला महत्व आहे.पितृ दिन असो किंवा मातृ दिन दोन्ही दिवस एकसमानच असतात. कारण मातृदिनाचा इतिहास १८६० या दशकाशी संबंधित आहे.त्यामुळे सर्वप्रथम मातृदिनाची सुरूवात अमेरिकेतुन झाली. यानंतर पितृदिनाची मागणी व्हायला लागली.१९०७ मध्ये प्रथमच पितृदिन अनधिकृतपणे साजरा करण्यात आला. यानंतर अधिकृतपणे १९१० ला पितृदिनाला सुरूवात झाली. मात्र पितृदिन साजरा करण्याच्या तारखांमध्ये मतभेद आहेत. मातृत्व दिन(मदर्स डे) प्रमाणेच वडिलांचा आदर सन्मान व्हावा व कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पितृदिन (फादर्स डे) साजरा केला जातो.जगात आई-वडील या शब्दाला कुठेही तोड नाही.कारण जगातील कोणतीही भाषा असो मामा-मामी, काका - काकु, माऊशी-मावसा, आत्या-मामा, ताई-दादा, आजी-आजोबा इत्यादी अनेक नाते आहेत व यासाठी वेळोवेळे शब्दप्रयोग सुध्दा आहेत.परंतु जगातील कोणत्याही कानाकोपऱ्यात जा तुम्हाला आई-वडील यांच्यासाठी एकच शब्द दिसेल.उदाहरण द्यायचे झाले तर आई-बाबा, मम्मी -पप्पा अशाप्रकारे जगात एकच शब्द आपल्याला आई-वडीलांसाठी दिसून येईल ही एक सृष्टीची लिलाच म्हणावी लागेल.मानवी नातेसंबंध आणि जगातील वेगवेगळ्या नात्यातील एक नातं म्हणजे वडिलांच नात असते.वडीलांच आणि मुलांचे नाते म्हणजे समुद्रातील पाण्यासारख अफाट असते.कारण प्रत्येक आई मुलांना घडवीते सुसंस्कृत करते व पदोपदी मुलांची काळजी घेते यातच मातृत्व दडलेले दिसून येते.कारण आई मुलांच्या सानिध्यात चोवीस तास असते.त्यामुळे आपले मुल काय करीत आहे आणि आपण त्यांच्यासाठी काय केले पाहिजे याची सटीक चाहूल फक्त आईलाच कळते व त्यापध्दतीने मुलांचे संगोपन करीत असते.आई अशी दैवी शक्ती आहे की मुला-मुलीनसाठी आकाश-पाताळ एक करते. परंतु मुलाला कधीच उपाशी ठेवत नाही.आई घरातील सर्वांचे जेवण झाल्यावरच जेवण करीत असते.आई-वडीलांच नातं या भुतलावर अफाट असुन न भूतो न भविष्यती अशाप्रकारचे हे नाते आहे.कारण वडिल भुक- तहान विसरून आपल्या कुटुंबाकरीता राबत असतो व घरग्रहस्ती चालवीतो. म्हणजेच घराला आर्थिक बळ देण्याचे काम वडिल करीत असतात तर वडिलांनी केलेल्या कमाईच्या आधारे घर चालवण्याची मोठी जबाबदारी आईची असते. कारण मोजक्या पैशात आईला घर चालवायचे असते.म्हणजे घरात काय कमी जास्त आहे हे सर्व आईलाच पहावे लागते व ही तीची मोठी कसोटीची परिक्षा असते. समाजात आईच्या कार्याला तोड नाही व वडिलांच्या कर्तुत्वाला कोणीही मात करू शकत नाही.म्हणुन सर्वांनीच लक्षात ठेवले पाहिजे की आपले खरे गुरु व दैवत आई-वडीलच त्यामुळे आजच्या तरुण पिढीने आई-वडीलांना प्रथम स्थानावर ठेवले पाहिजे.आई या शब्दाला किती महत्त्व आहे हे आपण या ओवी वरून समजू शकतो. आई माझा गुरु,आई कल्पतरू सुखाचा सागर आई माझी, प्रीतीचे माहेर, शांतीचे आगर मांगल्याचे सारं आई माझी. म्हणजे आईविना जग नाही व वडीलांविना आधार नाही. आपल्याला थोडीशी जरी इजा किंवा दुर्घटना झाली तर मुलं आईग म्हणून किंचाळतो तेव्हा आईच्या रूपात कोणीना-कोणी अवश्य धावुन येतोच ही दैवी शक्ती आई या शब्दात आपल्याला दिसुन येते.या उलटं वडिलांचे आहे.एखादी मोठी दुर्घटना घडली तर प्रत्येक व्यक्ती बापरे म्हणून जोरांनी ओरडतो अशा वेळी ताबडतोब आजुबाजुला असलेले नागरिक वडिलांची भूमिका बजावतात.म्हणजेच वडील तीथेच नसतांना सुध्दा तेथील संपूर्ण नागरिक वडिलांची भूमिका बजावतात. अशा वेळी आपणही म्हणतो की लोक देवासारखे धावुन आले. म्हणजे आईग आणि बापरे या कठीण शब्दांसामोर सर्वसामान्य माणूस आपल्या आई-वडिलांची भुमिका बजावतात व दैवी रूपाने मदतीला धावून येतात. मानवजातीमध्येच ज्याप्रमाणे आईची भूमिका असते त्याचप्रमाणे संपूर्ण पशुपक्षी व जीवसृष्टीमध्ये आईची भूमिका अग्रगण्य असल्याचे आपल्याला दिसून येते.कारण मुलांच्या आयुष्यात नेहमीच ती सुर्याच्या प्रकाशाप्रमाणे वावरत असते जेणेकरून मुलांच्या आयुष्यात कुठेही अंधक्कार पडणार नाही याची काळजी घेत असते.कारण आई आपल्या मुलांसाठी आपल्या जीवाचा आटापिटा करून मुलाला लहाण्याचा मोठा करते.त्यामुळे आज सर्वांचीच प्रथम जबाबदारी आहे की आपल्या आई-वडिलांची सेवा करने, पालनपोषण करणे, त्यांच्या प्रकृतीची काळजी घेणे व त्यांच्या वेदना जाणुन घेऊन त्यांवर उपाययोजना करणे आणि आई-वडीलांना सुखी व समाधानी ठेवणे यातच आपल्याला खरा जागतिक पितृदिन दीसुन येईल.माझ्यामते पितृदिन ठराविक दिवशीच का साजरा करावा.दररोज का साजरा का करू नये? मी तर म्हणेन की मातृत्व-पितृत्व दिवस हा दररोज आई-वडीलांची सेवा करून साजरा केला पाहिजे व आपण ते दिवस आठवायला पाहिजे की आपल्याला लहाण्याचे मोठे करण्यासाठी आईने कीती यातना व दुःख सहन केले असावे.याची जाणीव आज मुलांनी ठेवण्याची गरज आहे.कारण आईने आपल्याला वटवृक्षाच्या छायेत लहाण्याचे मोठे केले व याच वटवृक्षाचा पहारेकरी म्हणून वडिलांनी आपली चोख भुमिका बजावली. आई-वडीलच्या तत्परतेमुळेच मुलांच्या केसालाही धक्का लागत नाही ही दैवी शक्तीच म्हणावी लागेल.पितृत्व दिनाच्या निमित्ताने मी सर्वांना हेच सांगु इच्छितो की आपण सर्वांनी भारतीय संस्कृती जपायला हवी यातुनच आपल्याला खऱ्या अर्थाने आई-वडीलांची सेवा करता येईल.पाश्चिमात्य देशात आई-वडील सोडून इतर नातेसंबंध अंकल व ॲटी या दोन शब्दात संपुष्टात आली आहे.परंतु भारतीय संस्कृतीत आजी-आजोबा,काका-काकु,मामा-मामी, आत्या-मामा,ताई-दादा इत्यादी अनेक वेगवेगळे शब्द आपल्याला वेगवेगळ्या नात्यांप्रमाणे दिसून येतात त्यांचा सन्मान व्हायलाच पाहिजे. त्यामुळे अंकल-ॲन्टी हे पाश्चिमात्य शब्द विसरायला हवे. त्याचबरोबर मम्मी-पप्पा या शब्दांना पुर्णविराम देऊन आई-बाबा असे शब्द ऐकू आले तर भारतीय संस्कृतीचा सन्मान अवश्य होईल असे मला वाटते.आपण १५ जूनला पितृदिन (फादर्स डे) साजरा करीत असतांना पृथ्वी मातेचाही थोडासा विचार करायला हवा.कारण आज पृथ्वीची जोपासना होत नसल्याने निसर्ग दिवसेंदिवस कोपत आहे.याकरीता जागतिक पितृत्व दिनाचे औचित्य साधून प्रत्येक मुलांनी आई-वडीलांच्या आठवणीत रहावे यासाठी आजच्या दिवशी एकतरी वृक्ष लावले पाहिजे.यामुळे एकाच दिवशी देशासह संपूर्ण जगात करोडोंच्या संख्येने वृक्ष लागवड झाल्याचे आपल्याला दिसून येईल.यामुळे पृथ्वीचे संतुलन स्थिर रहाण्यास मोठी मदत होईल व आई-वडीलांना निसर्गाचा आनंद घेता येईल.कारण आज बदलत्या हवामानामुळे निसर्ग दिवसेंदिवस ढासळत आहे.त्यामुळे आई-वडीलांपेक्षा मोठी आणि महान म्हणजे धर्तीमाता (पृथ्वी) ज्यामुळे आज आपण या पृथ्वीतलावर सुखरूप आहोत.परंतु वाढत्या शहरीकरणामुळे व औद्योगिकीकरणामुळे जंगलतोड मोठ्या प्रमाणात होत असल्याने पृथ्वीमाता आज धोक्याच्या उंबरठ्यावर येऊन ठेपली आहे.त्यामुळे तीला वाचविण्याची जबाबदारी आज आपल्या सर्वांवर आली आहे. करिता पृथ्वीला आई-वडीलांचा दर्जा देवून मोठ्या प्रमाणात सर्वच स्तरातून वृक्षलागवड व्हायला हवी.यामुळे मानव, पशुपक्षी व संपूर्ण जीवजंतूच्या रक्षणासाठी मोठी मदत होईल व निसर्ग प्रफुल्लित ठेवण्यासाठी आणि ऑक्सिजनची मात्रा वाढविण्याच्या दृष्टीने हा आगळावेगळा उपक्रम ऐतिहासिक ठरेल.

------------------------

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**नागपूर**

# साक्री येथे महिला मंडळाने कल्पतरू चॅरिटेबल ट्रस्ट नंदुरबारतर्फे एक दिवसीय मोफत साबण निर्मिती प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न झाली

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

----------------



कल्पतरू चॅरिटेबल ट्रस्ट संचलित साक्री महिला मंडळ यांच्यातर्फे दि. १२/०६/२०२५, शुक्रवार रोजी महिलांना मोफत साबण बनवण्याचे प्रशिक्षण देण्यात आले.त्यात वेगवेगळ्या प्रकारचे आयुर्वेदिक सौंदर्य साबण बनवून लघु उद्योगास चालना कशी देण्यात येईल हे सांगण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन सौ ललिता भावसार यांनी केले होते .कार्यक्रमात प्रशिक्षक म्हणून कृतिका भावसार व रूपाली हरळे यांनी मोलाची भूमिका बजावली या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून नगरसेविक सौ संगीता भावसार , साक्री यांच्या सोबतच सौ.तारकेश्वरी निकम, सौ शितल सोनवणे व ज्येष्ठ नागरिक सुमन नांद्रे यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ शालिनी भामरे यांनी केले. या कार्यक्रमास सौ वर्षा बच्छाव , काजल कश्यप हर्षदा मराठे तसेच शिवप्रतिष्ठान साक्री येथील महिलांनी सहकार्य केले . हे प्रशिक्षण आमच्यासाठी खूपच मोलाचे ठरले , या प्रशिक्षणामुळे आम्ही साबण बनविण्याचा लघु उद्योग सुरू करून घर संसारात हातभार लावू शकतो अशी उत्स्फूर्त प्रतिक्रिया महिलांनी यावेळी दिली.मयुरी बोरसे , योगिता गीते , पुनम पवार, खुशी चौधरी यांनी आभार प्रदर्शन केले....या कार्यक्रमास कल्पतरू चारिटेबल ट्रस्ट चे अध्यक्ष सियामोहन शुक्ला, उपाध्यक्ष सौ पुनम भावसार, सचिव हसमुख भाई पांचाल, व खजिनदार नगमा खान यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. यापुढेही महिलांसाठी असेच नवनवीन उपक्रम राबवण्यात येतील असे ट्रस्ट मार्फत स्पष्ट करण्यात आले.

# शोक संदेश



कै. वसंत शिवराम साळुंके रा. भाडणे, ता. साक्री, जि. धुळे यांचे दिनांक १३/०६/२०२५ (शुक्रवार) रोजी संध्याकाळी ०६:०० वाजता दुःखद निधन झाले आहे. ते आश्रमशाळा देवळीपाडा येथे कार्यरत शिक्षक श्री. लक्ष्मण (सतिश) वसंत साळुंके सर यांचे वडील होते. त्यांची अंत्ययात्रा दिनांक १४/०६/२०२५ (शनिवारी) रोजी सकाळी १०:०० वाजता राहत्या घरी, साक्री (नवापूर रोड) येथून निघणार आहे.

# साक्री आगारात प्रवासी राजा दिन व कामगार दिन उत्साहात साजरा

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-----------------------



दिनांक ११/६/२०२५ साक्री आगारात कामगार व प्रवाशी दिवस असल्या कारणाने मा.विभाग नियंत्रक श्री विजय गीते, विभागीय वाहतुक अधिक्षक श्री देवराज विभागीय सांख्यिकी अधिकारी श्री सुरज माळि यांनी साक्रि आगारात आज रोजी भेट दिली त्यावेळी साक्रि आगारात प्रशासनाच्या वतीने आगार व्यवस्थापक साक्री श्री सुनिल महाले, कार्यशाळा प्रमुख योगेश शिंगांणे ,वाहतुक निरिक्षक पी के अहिरे ,साहाय्यक वाहतुक अधिक्षक दिलीप भामरे, वरिष्ठ लिपीक राहुल साळुंखे, हे आजच्या प्रवाशी राजा दिन व कामगार दिन साजरा करण्यासाठि उपस्थीत होते यावेळी मा विभाग नियंत्रक यांनी प्रवाशी व कामगारांच्या अडिअडचणी जाणुन घेतल्या तसेच कामगारांच्या अडिअडचणी जाणून त्यांना योग्य तो न्याय देण्याचे अश्वासीत केले.तसेच महाराष्ट्र एस टि वर्कर्स इटंक युनियन साक्रि आगार यांच्या वतीने मा.विभाग नियत्रंक यांचा सत्कार करण्यात आला इटंकच्या वतीने प्रकाश शिंदे, प्रविण कुमार साळवे, योगेश देवरे, नाजीम पिजांरा, खलील पिजांरा हिंमत सोनवणे, सुनील हेमाडे, यांनी विभाग नियंत्रक यांचा सत्कार केला.विभागीय वाहतुक अधिक्षक वासूदेव देवराज साहेब यांचा सत्कार नाजीम पिजांरा यांनी केला विभागीय सांख्यिकी अधिकारी सुरज माळी यांचा सत्कार विशाल सरग यांनी केला तसेच मा.विभाग नियंत्रक यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले आपल्या सर्वांच्या परिश्रमामुळेच धुळे विभाग व साक्री आगार राज्यात सर्व बाबींमध्ये सन २०२४ते २५ कालावधीत प्रथम येवू शकला हे सर्व कामगारांचे साघीक यश आहे आपल्या कामगीरी ची दखल घेवुनच परिवहन मंत्री व मध्यवर्ती कार्यालय प्रशासनाने संपूर्ण राज्यात धुळे व नंदुरबार जिल्हा व्यवस्थापन पॅटर्न राबविण्याचे घोषित केले व आपल्या कामगिरी मुळेच आम्हाला प्रतिनिधित्व करण्याची संधी मुबंई येथे मिळाली अम्हि जरी प्रतिनिधित्व केले पण आपण केलेल्या प्रमाणीक कामगिरी मुळेच आम्हाला ती संधी मिळाली हे नाकारून चालणार नाही म्हणुन सत्काराचे खरे मानकरी एस टि कामगार आहेत म्हणुन विभाग नियंत्रक विजय गिते साहेबांनी चालक वाहक यांत्रीक व कामगार बांधवांचा सत्कार केला.महाराष्ट्र एस टि वर्कर्स इटंक संघटना साक्री आगार सघंटनेचे साक्रि आगाराचे अध्यक्ष वैभव सोनवणे, राज्य कार्यकारिणी सदस्य महेश भदाणे, दिनेश नेरकर ,भास्कर शेवाळे , सुनिल हेमाडेआदि कामगार उपस्थित होते...

# आष्टा ग्रामपंचायतच्या वतीने गुणवंताचा सन्मान सोहळा संपन्न

विवेक कुलकर्णी
लातूर प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

-------------------



ग्रामपंचायत कार्यालय आष्टाचे लोकनियुक्त सरपंच सावता पंडु गायकवाड (माळी) यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनातुन आष्टा गावातील तरुण होतकरू मुला, मुलींना प्रेरणा मिळावी व गावाचे नावलौकिक वाढवण्यात मोलाची कामगिरी बजावणार्या मुला, मुलींना शाबासकी देणं हे गावाचे प्रथम नागरिक म्हणून आमचं आद्य कर्तव्य आहे या भावनेतून सरपंच सावता पंडु गायकवाड (माळी) यांनी सदर कार्यक्रमाचे आयोजन नियोजन केले. त्यानिमित्ताने कला, क्रीडा, शैक्षणिक सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या व्यक्तिमत्वाचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच सावता माळी हे होते. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून उपसरपंच भानुदास राठोड, ग्रामपंचायत अधिकारी योगीराज पांचाळ, मुख्याध्यापक अंकुश बिडवे, मनोज अष्टेकर हे होते तसेच समस्त ग्रामपंचायत सदस्य, विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे संचालक, गावातील प्रतिष्ठित नागरिक, लहान थोर मंडळी , समस्त ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. क्रिडाक्षेत्र कुस्ती विष्णु तातपुरे, महेश तातपुरे, विनोद कामाळे,खोखो राष्ट्रीय संघात सहभाग धनश्री गायकवाड, सानिया पटेल.सामाजिक क्षेत्रात अंकुश बिडवे भगतसिंग विद्यालय आष्टा शाळेचा १०० टक्के निकाल, बालाजी जाधव महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद संघटना लातुर यांच्यातर्फे जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानीत, सोपान सुर्यवंशी- अर्थिक दुर्बल घटकातील मुलांना शाळा प्रवेशासाठी सहकार्य व मार्गदर्शन , तुकाराम अलट नाशिक विभागीय संताजी धनाजी कार्यकर्ता सन्मान पुरस्कार सोहळ्यात संत गाडगेबाबा महाराज सामाजिक सेवा पुरस्कार मिळाल्याबद्दल सन्मान तसेच शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या इ.१० वी बोर्ड परीक्षेत प्रथम क्रमांक गायकवाड शंतनु किरण, द्वितीय क्रमांक शेळके गायत्री सिताराम, तृतीय क्रमांक निकम अमित अनिल, निकम ज्योत्सना शिवदीप, चौधरी प्रसाद बालाजी, स्नेहा उदय फुले, सार्थक सचिन वळसंगे, शार्दुल बळीराम वळसंगे, अंजली अनिल चौधरी, ऋषीकेश रमाकांत कलाडले, प्रगती पवन बिराजदार, डांगे गोवर्धन राम, गायकवाड श्रद्धा एकनाथ, संध्याराणी विष्णू शेळके, गायकवाड अमरजा ज्ञानेश्वर, जाधव कृष्णा दिलीप, चैतन्य विजयकुमार शेळके, तेजश्री उद्धव गायकवाड, अक्षरा कैलास निटुरे, विश्वजीत विठ्ठल गायकवाड, सय्यद अरहान इमरान, गायकवाड युवराज वैजनाथ, शिंदे गणराज तुकाराम तसेच महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांत शासकीय नोकरी मिळवलेले गुणवंत विद्यार्थी खटावकर सागर रंगनाथ (क्लर्क मुंबई हायकोर्ट ) वळसंगे आकाश लक्ष्मण (आरोग्य विभाग लातूर), रत्नाकर माणिकराव मुळे (मुंबई मेट्रो), माधुरी विनायक मुळे (पोस्टमन अमरावती) अशा तब्बल ३४ गुणवंतांचा सत्कार सरपंच, समस्त ग्रामस्थांच्या वतीने शाल, पुष्पहार, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला. सदर कार्यक्रमासाठी उपस्थित हनुमंत गायकवाड, सुभाष मुळे, राम डांगे, गोविंद मुळे, चांदपाशा पठाण, रमाकांत कलाडले, बाळासाहेब कदम, सामाजिक कार्यकर्ते किरण गायकवाड, जनार्दन निकम, फिरोज पटेल, विनायक मुळे, बब्रुवान डांगे, माणिक मुळे, नारायण बिराजदार, सोपान सूर्यवंशी, विजयकुमार क्षिरसागर ,पुंडलिक गायकवाड, सचिन वळसंगे, शब्बीर सय्यद, राम बिराजदार, दयानंद मुळे, श्याम आसोले, अंगद चव्हाण, संपतराव शिंदे, तेलंगे सर, प्रल्हाद गायकवाड, गणेश अष्टेकर, तसेच सर्व विद्यार्थ्यांचे पालक देखील मोठ्या संख्येने उपस्थित होते सदर गुणवंत विद्यार्थी घडवण्यामध्ये गावात सेवा देत असलेले सर्व शिक्षक बंधू भगिनी यांचा सिंहाचा वाटा असल्याने उपस्थित ग्रामस्थ तसेच सरपंच यांनी सर्वांचा सन्मान केला व अशीच आष्टा गावाची सेवा करुन गावचे भविष्य उज्ज्वल बनवावे अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. मनोगत पवन बिराजदार, मारोती मुसने सुत्रसंचालन तुकाराम अलट, आभार बळीराम वळसंगे यांनी मानले.

# कृषिभूषण ऍड. प्रकाश पाटील यांच्या सुचनेनुसार कृषीमंत्रालयात विविध विषयांसाठी कृषीमंत्रीं कोकाटे यांचे अध्यक्षतेखाली बैठक

श्री संजय बच्छाव
धुळे जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदूत

--------------------




दि १८/६/२५ रोजी कृषीमंत्रीं माणिकराव कोकाटे यांनी कृषिभूषन ॲड प्रकाश पाटील पढावद धुळे,अध्यक्ष शासकिय कृषी पुरस्कार प्राप्त शेतकरी संघ महाराष्ट्र राज्याच्या नेतृत्वाखाली बैठक लावली आहे.बैठकीत कृषी पुरस्कार पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांच्या मागण्या व सुचना, शेती साठी रोजगार हमी योजना लागु करणे, पिक विमा योजनेत सुधारणा,कृषी विद्यापीठे व के व्ही के सक्षम करणे, कृषीविषयक समितींवर पुरस्कार प्राप्त शेतकऱ्यांना प्रतिनिधित्व देणे, कृषी विद्यापिठांनी शेतकऱ्यांच्या गरजेनुसार संशोधन करणे, जमिनीची सुपीकता वाढुन उत्पादकता वाढविणे, नविन तंत्रज्ञानाचा वापर करून पिकाची उत्पादकता काढणे, केळी पिकाची लागवडीचा कै पांडुरंग फुंडकर योजनेत समावेश करणे,राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेत शेतकऱ्यांना दर्जेदार प्रमाणित बियाणे मिळणेसाठी शेतकरी उत्पादक कंपनींचा समावेश करणे,हे विषय राहणार आहेत. या बैठकीला कृषी मंत्री सोबत मा प्रधान सचिव कृषी (I A S ) , मा आयुक्त कृषी(IAS), मा महासंचालक कृषी शिक्षण व संशोधन परिषद (I A S ) , उप सचिव (I A S ) संबंधित सर्व कृषी संचालक, कृषी विद्यापीठाचे संशोधन संचालक, मुख्य सांखिकी (पिक विमा),व इतर संबंधित अधिकारी उपस्थित राहणार आहेत. कृषिभूषण ऍड प्रकाश पाटील यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या कृषी पुरस्कार प्राप्त शेतकरी संघाचे राज्याचे प्रतिनिधी कृषिभूषन प्रल्हाद वरे बारामती,कृषिभूषन सदाशिव थोरात परभणी, कृषिभूषन नाथराव कराड बीड,कृषिभूषन सर्जेराव पाटील कोल्हापुर, जगदिश चव्हाण यवतमाळ, रविंद्र गायकवाड सातारा, यज्ञेश सावे पालघर, अट्रास्वामी कोडपे नागपुर,बबन हरणे ठाणे, रविंद्र गायकवाड वाशिम, विश्वंभर बाबर सातारा, पांडुरंग डोंगरे जालना हे बैठकीसाठी आमंत्रित आहेत.

# गोंदियात अंमली पदार्थ विरोधात मोठी कारवाई गोंदिया जिल्ह्यात पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनात ९९७ ग्रॅम गांजासह दोन आरोपी ताब्यात – १ लाखांहून अधिक मुद्देमाल जप्त!

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराजदुत

---------------------





पोलीस अधीक्षक मा. श्री. गोरख भामरे व अप्पर पोलीस अधीक्षक श्री. नित्यानंद झा यांच्या स्पष्ट सूचनांनुसार जिल्ह्यात अंमली पदार्थांच्या विरोधात जोरदार मोहिम राबविण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून आज स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने रामनगर पो.ठा. अंतर्गत वसंतनगर भागात केलेली धाडसत्र कारवाई खूपच परिणामकारक ठरली आहे.

**कारवाईतील धक्कादायक तपशील:**

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने वसंतनगर भागात छापा टाकून

१) मुकेश सुदर्शन भारती (रा. देवरी)

२) राकेश यादोराव देवरे (रा. देवरी)

यांना गांजाची अवैध वाहतूक करताना रंगेहात अटक केली.

त्यांच्याकडून जप्त करण्यात आले: ९९७ ग्रॅम ओलसर गांजा – किमती ₹१९,९४०/-

आकाशी रंगाची स्कूल बॅग – ₹५००/-

एक मोटारसायकल – ₹८०,०००/-

एकूण जप्त मुद्देमाल – ₹१,००,४४०/-

दोघांवर सखोल चौकशी केली असता, त्यांनी हा गांजा गोविंद अग्रवाल (रा. बसंतनगर, गोंदिया) याच्याकडून विकत घेतल्याचे कबूल केले. त्यामुळे आता तिघांविरुद्ध एन.डी.पी.एस कायद्यांतर्गत कलम ८(क), २०, २९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई खालील अधिकाऱ्यांच्या नेतृत्वात पार पडली:

पो.नि. पुरुषोत्तम अहेरकर, सपोनि धीरज राजूरकर, मपोउपनि वनिता सायकर, पोउपनि शरद सैदाने, अंमलदार राजू मिश्रा, महेश मेहर, भुवनलाल देशमुख, दीक्षितकुमार दमाहे, दुर्गेश तिवारी, संजय चौहान, सुबोध बिसेन, प्रकाश गायधने, इंद्रजित बिसेन, संतोष केदार, छगन विठ्ठले, कुमुद येरणे, स्मिता तोंडरे, लक्ष्मण बंजार, राम खंदारे आदींनी ही कारवाई यशस्वीपणे पूर्ण केली.

# चिलाटी-नोनीटोला शेतकऱ्यांवर वीज पोल चोरीचं संकट – प्रशासन कुंभकर्णी झोपेत!

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

----------------------

२०२५ शेतकऱ्यांच्या जगण्याचा आधार असलेल्या विजेचे काही पोल आणि संपूर्ण वायरिंग २ फेब्रुवारी रोजी चोरीला गेल्यानंतर, चार महिने उलटून गेले तरी MSEB प्रशासन हातावर हात ठेवून बसले आहे! शेतकऱ्यांच्या तक्रारींकडे केवळ “ आज, उद्या” च्या थातुरमातुर आश्वासनांची उधळण करत वेळकाढूपणा सुरू आहे.

**शेतकऱ्यांचा थेट आरोप**

MSEB प्रशासन झोपेत आहे की मुद्दाम दुर्लक्ष करतंय? “FIR दाखल केल्याचं सांगितलं जातंय, पण आजवर कुठे, केव्हा, कोणती तक्रार दिली गेली — याचं ठोस उत्तर कोणी देत नाही, ” अशी संतप्त प्रतिक्रिया शेतकऱ्यांनी दिली. उन्हाळी पिके सुकत चालली आहेत, शेकडो एकरांवर पिकांचं नुकसान, हजारो रुपयांचा फटका. कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी शेतकरी रात्रंदिवस राबतोय, पण प्रशासनाच्या ढिसाळपणामुळे शेतकऱ्यांच्या घरात उपासमारीची वेळ येऊ पाहतेय. “पोशिंदा रडतोय, सरकार झोपलंय!” शेतकऱ्यांचा संतप्त सवाल रूपचंद टेंबरे, गिरधारी टेंबरे, दिवाकर भगत, रमेश टेंबरे, मुन्ना हरिंखेडे, सुरज टेभरे यांसारख्या शेतकऱ्यांनी थेट इशारा दिला







“ तत्काळ कारवाई झाली नाही तर आम्हाला आंदोलनाशिवाय पर्याय नाही!”

**महत्त्वाचे प्रश्न अनुत्तरितच:**

वायरिंग चोरीप्रकरणी FIR दाखल झाली का?

तांत्रिक पथक घटनास्थळी का पोहोचले नाही?

**प्रशासन चार महिने गप्प का?**

पोशिंद्याला वीज मिळवण्यासाठी आंदोलन करावं लागतं हे सरकारसाठी शरमेचं नाही का?

**MSEB चं गोंधळलेलं उत्तर:**

गोरेगावचे अभियंता विनीत वाहने म्हणाले:

“ १२ मे रोजी आम्ही पाहणी केली, FIR करत आहोत, वायर आणि कंडक्टर लावण्याचं काम सुरू करतो, दोन दिवसांत पुन्हा वीज जोडू.”

**पण शेतकऱ्यांचा सवाल ठाम आहे**

"FIR कुठे आहे? वायर दोन दिवसांत लागणार असं चार महिन्यांपासून सांगितलं जातंय!"

**शेतकऱ्यांचा इशारा:**

“शासनाने जागे व्हावं, अन्यथा आम्ही रस्त्यावर उतरणार!”

ही केवळ वीज चोरी नाही — शेतकऱ्यांच्या जिवंत संघर्षाची बेइमानी आहे. ज्या देशात शेतकऱ्याला विजेसाठी आंदोलन करावं लागतं, त्या व्यवस्थेचं शुद्धिकरण आता अपरिहार्य झालंय!

# सेवानिवृत्ती सत्कार व जागतिक बालमजूरी विरोध दिन उत्साहात साजरा

देवेंद्र दमाहे
गोंदिया जिल्हा प्रतिनिधी
दैनिक स्वराज्यदुत

---------------------






गोरेगाव पंचायत समितीमध्ये कार्यरत असलेले शिक्षण विस्तार अधिकारी डि. टी. कावळे व एच. एम. बोपचे यांची नियतवयोमानानुसार सेवानिवृत्ती झाली. त्यांच्या उल्लेखनीय सेवेसाठी महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक संघटना समिती व महिला मंच गोरेगाव यांच्या संयुक्त विद्यमाने गट साधन केंद्र, गोरेगाव येथे सेवानिवृत्ती सत्कार कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण विस्तार अधिकारी यु. एम. बोपचे होते. प्रमुख अतिथी म्हणून सेवानिवृत्त होणारे डि. टी. कावळे व एच. एम. बोपचे, जिल्हाध्यक्ष हरिराम येळणे गुरूजी, तालुकाध्यक्ष सुरज कोल्हारे, महिला सरचिटणीस सौ. संगीता घासले, तसेच श्री. सुरेंद्र जगने, किशोर शहारे, संतोष चित्रीव, सतीश बावणकर आदी मान्यवर उपस्थित होते. सत्कारमुर्तींचा शाल, पुस्तक व पुष्पगुच्छ देऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात जागतिक बालमजूरी विरोध दिवस साजरा करून करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुकाध्यक्ष सुरज कोल्हारे यांनी केले, सूत्रसंचालन सौ. भांडकर मॅडम यांनी तर आभार प्रदर्शन जिल्हा उपाध्यक्ष सौ. संगीता घासले यांनी केले. या कार्यक्रमात महिला संघटक स्नेहा कोरे, कु. पी. एम. रंगारी, कु. वैशाली राऊत, एम. बी. पारधी, मुकेश अंबादे, उमराव डोलारे, ओमजय कावरे, पांडुरंग देशमुख, नृपराज शेंडे आदींनी संयोजन व सहकार्य केले. कार्यक्रम उत्साहात पार पडला आणि उपस्थितांनी सेवानिवृत्त अधिकारी व बालमजूरीविरोधी संदेश यांचे महत्त्व अधोरेखित केले.

PASSWORD PROTECTED PAGE